पाईल्सचा कायमचा उपाय ! वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
कमी वेदना, जलद बरे होणे
लेझर व प्रगत तंत्रज्ञान
अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
काळे ज्वेलर्स
9601222777
9615222777
सोने चांदी हिरे नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २३७ । किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | गुरूवार ०१/१०/२०२६ । पान- ६

सिल्क फेस्टीव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा महोत्सव सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून राजेंद्र विश्वासाची सार्थ परंपरा...
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०, ७९०१० ३११५५.

# अखेर फॉर्म-६ ची तरतूद मागे

## दबावानंतर निवडणूक आयोगाची माघार

मुंबई (वृत्तसंस्था)

अखेर निवडणूक आयोगाने एका निर्णयात माघार घेतली आहे. निवडणूक आयोगाने ज्या राज्यांमध्ये विशेष एसआयआर प्रक्रिया पूर्ण झाली आहे, त्या राज्यातील ऑनलाइन फॉर्म ६मधून अतिरिक्त एसआयआर संबंधातील डिक्लेरेशन हटवलं आहे. फॉर्म ६मध्ये नवीन तरतूद जोडल्यानंतर त्यावर आक्षेप घेण्यात आला होता. त्यामुळे निवडणूक आयोगाने अखेर हा निर्णय घेतला आहे. या निर्णयानंतर आता नवीन व्होटर कार्ड बनवताना लोकांना आपल्या पूर्वजांची माहिती देण्याची गरज पडणार नाही.मीडिया रिपोर्टनुसार, तीन निवडणूक आयुक्तांपैकी दोन निवडणूक आयुक्तांनी फॉर्म ६ मधील बदलाला आक्षेप घेतला होता. निवडणूक आयुक्त विवेक जोशी यांच्या म्हणण्यानुसार, 'रजिस्ट्रेशन ऑफ इलेक्टर्स रूल्स, १९६०' च्या अंतर्गत फॉर्म ६ च्या नियमात दुरुस्ती केल्याशिवाय कोणताही बदल करता येणार नाही. या मुद्द्याशी दुसरे निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू सुद्धा सहमत होते. २६ सप्टेंबर रोजी झालेल्या तिन्ही निवडणूक आयुक्तांच्या बैठकीत हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा होता.मीडिया रिपोर्टनुसार, निवडणूक आयुक्त विवेक जोशी आणि सुखबीर सिंह संधू यांनी गेल्या १० महिन्यात १४ वेळा निवडणूक आयुक्तांच्या विविध निर्णयांवर आक्षेप घेतला होता. त्यात फॉर्म ६ आणि एउखछएढ च्या मुद्द्याचा समावेश होता. तथापि, २६ सप्टेंबर रोजी आयोगाच्या बैठकीनंतर पत्रकार परिषद घेऊन हा मुद्दा कर्मचाऱ्यांशी संबंधित असल्याचं सांगून आरोप नाकारण्यात आले होते.तर एउखछएढ वर ऑनलाइन फॉर्म ६ च्या प्रक्रियेत एसआयआरशी संबंधित डिक्लेरेशन समाविष्ट करण्यात आल्याने त्यावर संधू यांनी आक्षेप घेतला होता. तसेच हा बदल बेकायदेशीर असल्याचं सांगत हे डिक्लेरेशन हटवण्याची मागणी त्यांनी केली होती. आता फॉर्म ६मधील नवीन तरतूद हटवण्याचा निर्णय आयोगाच्या संपूर्ण टीमने घेतला आहे.

फॉर्म ६मध्ये दिलेल्या डिक्लेरेशननुसार व्होटर कार्ड बनवणाऱ्या अर्जदाराला स्वत: किंवा त्याचे आईवडील वा आजी आजोबा वा पणजोबा पणजी यांच्या आधी झालेल्या इंटेन्सिव्ह रिव्हिजनच्या दरम्यानची व्होटर लिस्ट जोडणारी माहिती देणँ आवश्यक केलं होतं. ज्या राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात एसआयआरची प्रक्रिया सुरू आहे, त्या राज्यात एउखछएढ पोर्टलवर डिक्लेरेशनची माहिती राहणार आहे.

# साकूर पठारावर एमआयडीसीसाठी सर्वेक्षणाला गती द्या

## आ. सत्यजित तांबे यांचा एमआयडीसी अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण विकास, दूध व्यवसाय, सहकार आणि शिक्षण आणि सततची विकास कामे या माध्यमातून राज्यासाठी मार्गदर्शक ठरलेल्या संगमनेर तालुक्यात नव्याने एमआयडीसीच्या माध्यमातून अधिक रोजगार उपलब्ध निर्मितीसाठी आमदार सत्यजित तांबे यांनी उद्योग मंत्री व एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला असून साकुर पठार भागातील एमआयडीसीसह सहकारी एमआयडीसीच्या विविध प्रश्नांबाबत त्यांनी चर्चा केली. तसेच लवकरात लवकर सर्वेक्षण पूर्ण करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करा अशी मागणी त्यांनी केली.



मुंबई येथे एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी देपेंद्रसिंह कुशावह व अहिल्यानगर येथील एमआयडीसीच्या संबंधित अधिकाऱ्यांची बैठक पार पडली. यावेळी आमदार सत्यजित तांबे यांनी साकुर पठार भागामध्ये एमआयडीसी साठी लवकरात लवकर सर्वेक्षण व्हावे पाणीपुरवठ्याचे नियोजन व्हावे याबाबत चर्चा केली.

संगमनेर तालुका हा विस्ताराने मोठा असून भौगोलिक दृष्ट्या पठार भाग, प्रवरा पट्टा व तळेगाव भाग अशी तीन विभाग पडतात. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श विचारांवर संगमनेर तालुक्याचे वाटचाल सुरू असून लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण विकास, दूध व्यवसाय, शिक्षण, सहकार या माध्यमातून तालुक्यात आर्थिक समृद्धी निर्माण झाली आहे. शांतता, सुव्यवस्था ही संगमनेर तालुक्याचे वैशिष्ट्य असून माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी निळवंडे धरण, नाशिक पुणे हायवे, शहरासाठी थेट पाईपलाईन योजना, विविध वैभवशाली इमारती, प्रत्येक गावामध्ये विकासाच्या योजना, नद्या ओढे यांच्यावर सिमेंट बांधारांचे जाळे निर्माण करून तालुक्याची प्रगती साधली.

याचबरोबर सहकारी एमआयडीसीमध्ये सुमारे १८० विविध व्यवसाय असून त्या माध्यमातून ५००० नागरिकांना रोजगार मिळाला आहे. तालुक्यात नव्याने शासकीय एमआयडीसी व्हावी याकरता लोकनेते बाळासाहेब थोरात व आमदार सत्यजित तांबे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. आमदार सत्यजित तांबे यांनी मुंबई येथे एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिपेंद्रसिंह कुशावह व अहिल्यानगर जिल्ह्यातील एमआयडीसी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन साकुर, बोटा, पठारभाग परिसरामध्ये लवकरात लवकर सर्वेक्षण पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात व्हावी याबाबतच्या सूचना केली अशी मागणी ही केली.

तसेच संगमनेर सहकारी औद्योगिक वसाहती मधील विविध प्रश्न आहेत ते सोडवण्यासाठी उद्योग विभागाने तातडीने मदत करावी अशी मागणी ही आमदार सत्यजित तांबे यांनी केली असून या बैठकीच्या माध्यमातून एमआयडीसीच्या कामाला गती मिळेल व सहकारी औद्योगिक वसाहत मधील प्रश्न सोडवण्यासाठी ही उद्योग विभाग मदत करेल असे आश्वासित करण्यात आले आहे.

# तमाशाच्या बदलत्या विश्वाचा वेध

## पद्मश्री रघुवीर आणी मंदाराणी खेडकर यांची संगमनेरमध्ये प्रकट मुलाखत



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सिनेमा थिएटरमधून मल्टिप्लेक्समध्ये स्थिरावला आणि सर्वसामान्य प्रेक्षकांपासून काही अंशी दुरावत गेला. दुसरीकडे, नाटकांचे प्रयोग आणि नाट्यकलावंतांचे दर्शनही निमशहरी भागात दुर्मीळ होत चालले असून अनेक ठिकाणची नाट्यगृहे ओस पडत आहेत. या बदलत्या सांस्कृतिक वातावरणात महाराष्ट्राच्या लोककलेचा महत्त्वाचा घटक असलेल्या तमाशाचे आजचे वास्तव काय आहे? गावखेड्यांमध्ये तमाशाला प्रेक्षक मिळतात का? जत्रांमधील तमाशाची गर्दी कायम आहे का? तमाशा कलावंताचे जीवनमान कसे आहे आणि या कलेतून त्याच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह होतो का? (पान ४ वर)

# मी जिल्ह्याचा खासदार; मला बैठकीला बोलवायला हवे होते - खासदार निलेश लंकेंची उघड नाराजी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची आगामी निवडणूक बिनविरोध करण्यासाठी राजकीय हालचालींना वेग आला असतानाच, संगमनेर येथे झालेल्या सर्वपक्षीय नेत्यांच्या बैठकीवरून दक्षिण अहिल्यानगरचे खासदार निलेश लंके यांनी उघड नाराजी व्यक्त केली आहे. या बैठकीचे निमंत्रण आपल्याला देण्यात आले नसल्याने त्यांनी स्पष्ट शब्दांत खंत व्यक्त करत, 'मी या जिल्ह्याचा खासदार आहे, मला जबाबदारीने बैठकीला बोलवायला हवे होते,' अशी भूमिका मांडली.

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याच्या दृष्टीने सर्व राजकीय पक्ष व प्रमुख नेत्यांनी एकत्र येण्याची गरज असल्याचे खासदार लंके यांनी सांगितले. व्यक्तिगत मतभेद, हेवेदावे आणि पक्षीय राजकारण बाजूला ठेवून जिल्ह्याच्या हितासाठी निर्णय घेणे आवश्यक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.



पत्रकारांशी संवाद साधताना लंके म्हणाले, जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध होत असेल तर ही चांगली बाब आहे. मात्र, कोण कोणत्या पक्षाचा आहे किंवा कोणाचा कोणाला विरोध आहे, हे बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र आले पाहिजे. संगमनेर येथे झालेल्या बैठकीला मला बोलावण्यात आले नाही. अहिल्यानगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात आठ तालुके येतात आणि मी या भागाचे प्रतिनिधित्व करतो. त्यामुळे अशा महत्त्वाच्या प्रक्रियेत मला विश्वासात घेणे अपेक्षित होते.

दरम्यान, या बैठकीसंदर्भात काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्याशी चर्चा करणार का, असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता लंके यांनी सावध भूमिका घेतली. अद्यापपर्यंत यासंदर्भात कोणाचाही फोन आलेला नाही. बाळासाहेब थोरात हे आमचे नेते आहेत. त्यामुळे त्यांच्याशी बोलण्यात कोणतीही अडचण नाही. पक्षाच्या पातळीवर आम्ही याबाबत नक्कीच बोलू, असे त्यांनी सांगितले.

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी विविध राजकीय पक्षांमध्ये जुळवाजुळव सुरू असतानाच खासदार लंके यांनी व्यक्त केलेली नाराजी चर्चेचा विषय ठरली आहे. विशेषत: दक्षिण लोकसभा मतदारसंघातील आठ तालुक्यांचा संदर्भ देत त्यांनी आपली भूमिका मांडल्याने या निवडणुकीच्या राजकीय समीकरणांवर त्याचा काय परिणाम होतो, याकडे आता जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# संगमनेर एमडी ड्रग प्रकरणात आरोपीची कोठडी वाढली

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : शहरातील वादग्रस्त ठरलेल्या एमडी ड्रग प्रकरणाचा तपास आता स्थानिक गुन्हे शाखेकडून वेगाने सुरू असून, मोटरसायकलमध्ये ड्रग ठेवणाऱ्या मुख्य आरोपी तौसिफ ताहीर कुरेशी याच्या पोलिस कोठडीत वाढ करण्यात आली आहे. दरम्यान, तौसिफच्या मोबाईलची तपासणी केली असता त्याने काही चॅटिंग आणि कॉलिंग डिलीट केल्याचे तपासात समोर आल्याने पोलिसांचा संशय अधिक बळावला आहे. संगमनेर शहर पोलिसांनी एमडी ड्रग बाळगल्याच्या आरोपावरून काशीफ असद कुरेशी याला अटक केल्यानंतर या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. सदर कारवाई बनावट असल्याचा आरोप करत संबंधित पोलिस उपनिरीक्षक व कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर या प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला.

गुन्हे शाखेने तपासाची सूत्रे हाती घेतल्यानंतर तौसिफ ताहीर कुरेशी याला नेवासे फाटा परिसरातून अटक केली. त्याच्याकडील मोबाईल पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याची तपासणी केली असता, काही चॅटिंग तसेच कॉलिंग डिलीट केल्याचे निदर्शनास आले. (पान २ वर)

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा आणि एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल ™
होलसेल बस्ता बांधा मस्त ऑफर मिळतेय जबरदस्त !
FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

PBM Jewellers
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

# महाराष्ट्रातील तरुणांना आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणार - मुख्यमंत्री

मुंबई (वृत्तसंस्था)

देशाच्या युवा शक्तीला रोजगारक्षम बनविण्यासाठी शिक्षणासोबत कौशल्य विकास, प्रशिक्षण आणि रोजगार यांची सांगड घालणे आवश्यक आहे. केवळ पदवी मिळवणे पुरेसे नसून एआय, सेमीकंडक्टर, क्वांटम कॉम्प्युटिंग यांसारख्या बदलत्या तंत्रज्ञानानुसार सातत्याने अपस्किलिंग करून नवीन कौशल्ये आत्मसात करणे काळाची गरज आहे. जगातील २८ हून अधिक देशांमध्ये कुशल मनुष्यबळाची मोठी मागणी असून, महाराष्ट्रातील तरुणांना आंतरराष्ट्रीय रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



एसएनडीटी महिला विद्यापीठात कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने आयोजित 'पंडित दीनदयाल उपाध्याय महारोजगार मेळाव्या'चा कोकण व नाशिक विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ऑनलाइन शुभारंभ करण्यात आला. यावेळी कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, पणन मंत्री जयकुमार रावल यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्हिडीओ संदेशाद्वारे शुभेच्छा दिल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण आणि रोजगार ही त्रिसूत्री महत्त्वाची आहे. देशातील सुमारे ६५ टक्के लोकसंख्या कार्यक्षम युवाशक्ती असून, एका बाजूला उद्योगांना कुशल मनुष्यबळाची गरज आहे, तर दुसरीकडे तरुणांना रोजगाराची आवश्यकता आहे. या दोघांना जोडणारा महत्त्वाचा दुवा म्हणून रोजगार मेळावे काम करत आहेत. युवकांनी बदलत्या तंत्रज्ञानानुसार सातत्याने नवीन कौशल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन त्यांनी केले.

मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले की, यंदा केवळ आयटीआय विद्यार्थ्यांपुरते मर्यादित न राहता सर्व स्तरांतील तरुणांसाठी प्रत्येक तालुक्यात रोजगार मेळावे घेण्यात येत आहेत. रोजगारपूर्व सात दिवसांचे मोफत प्रशिक्षण आतापर्यंत ६१ हजार युवकांनी घेतले असून, मेळाव्यासाठी एक लाखांहून अधिक तरुणांनी नोंदणी केली आहे. किमान ७० टक्के तरुणांना रोजगार किंवा स्वयंरोजगाराशी जोडण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी रोजगारक्षम शिक्षणाची गरज व्यक्त करताना युवकांना मुलाखतपूर्व प्रशिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास, संवादकौशल्य, सॉफ्ट स्किल्स आणि व्यवस्थापन कौशल्याचे प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचे सांगितले.

पणन मंत्री जयकुमार रावल यांनी महाराष्ट्राला 'ग्लोबल एम्प्लॉयमेंट हब' बनविण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे सांगितले. राज्यातील युवकांना देशासह परदेशात रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी आवश्यक भाषा व कौशल्य प्रशिक्षण देण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कोकण व नाशिक विभागातील १२ जिल्ह्यांत ४०० हून अधिक रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले असून, आतापर्यंत १,५०० हून अधिक उद्योजकांनी नोंदणी केली आहे. रोजगार इच्छुक एक लाखांहून अधिक युवक-युवती सहभागी झाले असून, विविध कंपन्यांकडून २५ हजारांहून अधिक रोजगाराच्या रिक्त पदांची मागणी नोंदविण्यात आली आहे.

महिलांच्या रोजगार सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी एसएनडीटी महिला विद्यापीठात स्वतंत्र महिला रोजगार मेळावाही आयोजित करण्यात आला. यामध्ये ३६ उद्योजक सहभागी झाले असून, स्वयंरोजगारासाठी विविध शासकीय योजनांची माहिती देणारे स्टॉलही उपलब्ध करून देण्यात आले.

# महात्मा गांधी जयंतीनिमित्त जयहिंदच्यावतीने 2 ऑक्टोंबरला संगमनेरमध्ये विविध कार्यक्रम

युवावार्ता ( प्रतिनिधी )

संपूर्ण जगाला सत्य व अहिंसेचा मंत्र देणारे भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५७ व्या जयंती निमित्ताने जयहिंद लोकचळवळीच्या वतीने लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीमध्ये संगमनेर मध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी महात्मा गांधी यांची वेशभूषा केलेल्या १५७ विद्यार्थ्यांची प्रभात फेरी, गांधीं भजन हे कार्यक्रम होणार असून दुपारी ४ वाजता जवाहरलाल हाजीर हो या पुस्तकाचे प्रकाशन असल्याची माहिती जयहिंद लोकचळवळीचे संस्थापक मा.आ.डॉ.सुधीर तांबे यांनी दिली आहे.



राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त जयहिंद लोक चळवळीच्या वतीने आयोजित विविध कार्यक्रमांची माहिती देताना संस्थापक माजी आमदार डॉ.सुधीर तांबे म्हणाले की, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी संपूर्ण जगाला मानवतेचा आणि शांततेचा संदेश देताना सत्य व अहिंसा हे मूलमंत्र दिले आहेत. त्यांच्याच विचारांची जगाला आज गरज असून त्यांच्या १५७ व्या जयंतीनिमित्त संगमनेर मध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ७.३० वाजता यशोधन कार्यालय येथील मैदानापासून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची वेशभूषा केलेल्या १५७ विद्यार्थ्यांची प्रभात फेरी निघणार आहे. यानंतर संगमनेर बस स्थानक येथे सकाळी ८.३० महात्मा गांधीजी यांचे आवडते भजने सादर केली जाणार आहेत. याचबरोबर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची भव्य रांगोळीतून प्रतिमा साकारली जाणार आहे. यावेळी माजीमंत्री बाळासाहेब थोरात आमदार सत्यजित तांबे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तर दुपारी ४ वाजता सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात महाविद्यालयातील के.बी.दादा सभागृह येथे पंकज चतुर्वेदी लिखित आणि राहुल कोसंबी अनुवादित जवाहरलाल हाजीर हो या पुस्तकाचे प्रकाशन राज्याचे मा.महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ साहित्यिक प्रा.रंगनाथ पठारे व वक्ते संजय आवटे हे उपस्थित राहणार आहेत. तसेच डॉ.राहुल कोसंबी, श्रीमती प्रमिला माया नारायण, गणेश घुले यांच्यासह आमदार सत्यजित तांबे,सौ.दुर्गाताई तांबे, युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ.जयश्रीताई थोरात, नगराध्यक्ष डॉ.सौ.मैथिलीताई तांबे व विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.यावेळी संजय आवटे यांचे व्याख्यान होणार आहे.

# खेडकर कुटुंबाच्या मालमत्तेवर एसीबीचा छापा

मुंबई (प्रतिनिधी)

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सेवानिवृत्त अधिकारी तथा वादग्रस्त आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांचे वडील दिलीप खेडकर यांच्या पाथर्डी तालुक्यातील भालगाव येथील निवासस्थानी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) नाशिक व अहिल्यानगर पथकाने छापा टाकला. या कारवाईत खेडकर कुटुंबाच्या विविध मालमत्तांशी संबंधित कागदपत्रे ताब्यात घेऊन त्यांची तपासणी करण्यात आली. तपासात खेडकर कुटुंबाकडे १३ कोटी ३० लाख ८१ हजार ६९६ रुपयांची बेहिशोबी मालमत्ता आढळल्याचा दावा एसीबीने केला आहे.

या प्रकरणी दिलीप खेडकर व त्यांच्या पत्नी डॉ. मनोरमा खेडकर यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अहिल्यानगर येथील पंढरीनाथ शंकर साबळे यांनी खेडकर यांच्या संपत्तीची चौकशी करावी, अशी तक्रार २०१२ मध्ये केली होती. या तक्रारीच्या आधारे एसीबीने तपास सुरू केला. अहिल्यानगर एसीबीच्या पोलिस निरीक्षक सविता तांबे यांनी खेडकर दाम्पत्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. खेडकर हे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळात १९८९ पासून सेवेत होते. मे २०२३ मध्ये ते सेवानिवृत्त झाले. एसीबीच्या पथकाने त्यांच्या सेवाकाळातील तसेच त्यानंतरच्या १९९५ ते २०२३ या कालावधीतील मालमत्ता, आर्थिक व्यवहार, उत्पन्न आणि खर्चाची तपासणी केली. या कारवाईत नाशिक, अहिल्यानगर आणि पाथर्डी पोलिस ठाण्यांतील सुमारे ४० अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. पथकाने भालगाव येथील निवासस्थानासह खेडकर कुटुंबाच्या विविध मालमत्तांशी संबंधित कागदपत्रांची तपासणी केली. एसीबीच्या तपासानुसार, खेडकर कुटुंबाचे ज्ञात उत्पन्न १३ कोटी २ लाख ७८ हजार ७७५ रुपये, तर एकूण खर्च १५ कोटी ३३ लाख ७४ हजार ८५५ रुपये असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच त्यांच्या ज्ञात मालमत्तेचे मूल्य १० कोटी ९९ लाख ८५ हजार ६१६ रुपये असल्याचे तपासात समोर आले.

## पान १ वरून संगमनेर एमडी ड्रग प्रकरणात...

त्यामुळे या संवादातून नेमकी कोणती माहिती समोर येते आणि त्याचा याप्रकरणातील इतर आरोपींशी काय संबंध आहे, याचा तपास आता केला जात आहे.

या प्रकरणात काशीफ असद कुरेशी, तौसिफ ताहीर कुरेशी, गुलाम फरीद गुलाम साबीर कुरेशी आणि इमरान सत्तार सौदागर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल आहे. या आरोपींपैकी उर्वरित आरोपींचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेकडून प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, या प्रकरणातील सुरुवातीच्या पोलिस कारवाईवरून निर्माण झालेल्या वादामुळे पोलिस यंत्रणेचीही मोठी कसोटी लागली आहे. संबंधित पोलिस उपनिरीक्षकाची मुख्यालयात रवानगी करण्यात आली आहे. त्यामुळे तपास जसजसा पुढे सरकेल, तसतसे या प्रकरणात आणखी कोणाची नावे समोर येतात का, याकडे संगमनेरकरांचे लक्ष लागले आहे. मोबाईलमधील डिलीट केलेल्या चॅटिंग व कॉलिंगचा तपास, तसेच उर्वरित आरोपींच्या अटकेनंतर या प्रकरणाचे नेमके स्वरूप अधिक स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

# बालकांमधील त्वचारोग कारणे, लक्षणे आणि प्रतिबंध

बालकांचे आरोग्य म्हणजे कुटुंबाच्या आनंदाचा आणि निरोगी समाजाच्या भवितव्याचा पाया होय. बालपणी शरीराची रोगप्रतिकारक शक्ती पूर्णपणे विकसित झालेली नसल्यामुळे तसेच त्वचा तुलनेने नाजूक व संवेदनशील असल्यामुळे



विविध त्वचारोग होण्याची शक्यता असते. हवामानातील बदल, घाम, अस्वच्छता, संसर्ग, ॲलर्जी, कीटकदंश, पोषणातील कमतरता आणि त्वचेची योग्य काळजी न घेणे यामुळे बालकांमध्ये त्वचेच्या तक्रारी दिसून येतात. बालकांमध्ये आढळणाऱ्या त्वचारोगांमध्ये ॲटॉपिक डर्माटायटिस (एक्झिमा), घामोळे, बुरशीजन्य संसर्ग, खरूज (Scabies), इम्पेटिगो, विषाणूजन्य पुरळ, ॲलर्जिक त्वचारोग आणि विविध प्रकारच्या त्वचेच्या संसर्गाचा समावेश होतो.

**ॲटॉपिक डर्माटायटिस किंवा एक्झिमा**

लहान मुलांमध्ये एक्झिमा हा तुलनेने सामान्य त्वचारोग आहे. त्वचा कोरडी पडणे, लालसर होणे, खाज येणे आणि काही ठिकाणी त्वचेवर पुरळ येणे ही त्याची प्रमुख लक्षणे आहेत. वातावरणातील धूळ, काही साबण किंवा सुगंधी उत्पादने, हवामानातील बदल आणि त्वचेची कोरडेपणा यामुळे त्रास वाढू शकतो. अशा वेळी त्वचा स्वच्छ ठेवण्याबरोबरच डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य मॉइश्चरायझर वापरणे उपयुक्त ठरते.

**घामोळे** - उन्हाळ्यात किंवा जास्त घाम येणाऱ्या वातावरणात बालकांच्या त्वचेवर लहान लालसर दाणे व खाज निर्माण होऊ शकते. याला सामान्यतः घामोळे म्हणतात. बालकांना सैल, स्वच्छ आणि हवेशीर कपडे घालावेत. शरीरावर जास्त वेळ धाम साचू नये याची काळजी घ्यावी.

**खरुज** - खरूज हा संसर्गजन्य त्वचारोग असून तो जवळच्या त्वचा संपर्कातून पसरू शकतो. विशेषतः रात्री तीव्र खाज येणे आणि त्वचेवर बारीक पुरळ दिसणे ही सामान्य लक्षणे आहेत. कुटुंबातील एका व्यक्तीस खरुज असल्यास इतर सदस्यांमध्येही संसर्ग होण्याची शक्यता असते. त्यामुळे संशय आल्यास स्वतःहून औषधोपचार न करता त्वचारोग तज्ज्ञांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.

**बुरशीजन्य संसर्ग-** त्वचेवर जास्त ओलावा राहणे, घाम आणि अस्वच्छता यामुळे बुरशीजन्य संसर्ग होऊ शकतो. त्वचेवर गोलाकार लालसर चट्टे, खाज किंवा त्वचा सोलणे अशी लक्षणे दिसू शकतात. मुलांचे कपडे, टॉवेल आणि वैयक्तिक वस्तू इतरांसोबत शेअर करू नयेत.

**जिवाणूजन्य त्वचारोग** - काही जिवाणूजन्य संसर्गामुळे त्वचेवर लालसर पुरळ, लहान फोड किंवा खपली निर्माण होऊ शकते. बालकांनी पुरळ किंवा फोड वारंवार खाजवू नयेत. संसर्ग वाढत असल्यास किंवा तापासारखी इतर लक्षणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा.

**प्रतिबंध हाच सर्वोतम उपाय** - बालकांची त्वचा निरोगी ठेवण्यासाठी नियमित स्वच्छता, योग्य आहार आणि पुरेशी झोप महत्त्वाची आहे. मुलांना नियमित आंघोळ घालावी; मात्र त्वचेवर अतिप्रमाणात साबण किंवा तीव्र सुगंधी उत्पादने वापरणे टाळावे. ऋतूनुसार आरामदायी कपडे वापरावेत. नखे वेळोवेळी कापावीत, कारण खाजवल्यामुळे त्वचेवर जखम होऊन संसर्ग होऊ शकतो. बालकांच्या आहारात दूध व दुग्धजन्य पदार्थ, डाळी, कडधान्ये, फळे, भाज्या, धान्ये आणि आवश्यकतेनुसार इतर पौष्टिक पदार्थांचा समतोल समावेश असावा. कोणत्याही विशिष्ट अन्नामुळे पुरळ किंवा ॲलर्जी वारंवार होत असल्याचे जाणवल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**पालकांनी कोणती काळजी घ्यावी?**

आयुर्वेदाच्या दृष्टीनेही बालकांच्या त्वचेच्या आरोग्यासाठी योग्य आहार-विहार, स्वच्छता आणि ऋतुनुसार दिनचर्या यांना महत्त्व दिले जाते. मात्र बालकांमध्ये कोणतेही औषध, काढा, लेप किंवा उपचारपद्धती तज्ज्ञ वैद्यांच्या मार्गदर्शनाखालीच वापरणे योग्य आहे. बालकांच्या त्वचेवरील प्रत्येक पुरळ हा संसर्गजन्य त्वचारोगच असेल असे नाही आणि प्रत्येक पुरळासाठी एकच उपचार योग्य नसतो. त्यामुळे त्वचेतील बदलांकडे दुर्लक्ष न करता त्यामागील कारण समजून घेणे महत्त्वाचे आहे. पालकांची जागरुकता, स्वच्छतेच्या चांगल्या सवयी, पौष्टिक आहार आणि योग्य वेळी तज्ज्ञांचा सल्ला यामुळे बालकांचे त्वचारोग मोठ्या प्रमाणात टाळता किंवा योग्य प्रकारे नियंत्रित करता येऊ शकतात. पालकांनी स्वतःहून औषधोपचार न करता तज्ज्ञांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.

बालकांच्या त्वचारोगांच्या निदान व उपचारासाठी आवश्यक वैद्यकीय सल्ला आणि तज्ज्ञ मार्गदर्शन सिद्धकला रुग्णालय, संगमनेर येथे उपलब्ध आहे. बालकाच्या वय, प्रकृती, आहार-विहार, त्वचेची स्थिती आणि आजाराची तीव्रता यांचा विचार करून योग्य उपचारपद्धती निश्चित केली जाते. आवश्यकतेनुसार बालरोगतज्ज्ञ व आयुर्वेद तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली तपासणी, निदान, आहार-विहारविषयक मार्गदर्शन आणि योग्य उपचार उपलब्ध करून दिले जातात.

पालकांनी बालकाच्या त्वचेतील कोणताही असामान्य किंवा वारंवार होणारा बदल दुर्लक्षित न करता योग्य वेळी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. निरोगी त्वचा, योग्य आहार आणि चांगल्या आरोग्याच्या सवयी ही बालकाच्या निरोगी वाढीची महत्त्वाची पायाभरणी आहे.

**वैद्य पल्लवी मोरे**
**(आयुर्वेद बालरोग तज्ज्ञ)**
**सिद्धकला आयुर्वेदिक महाविद्यालय, संगमनेर**

# दशक्रियाविधीत डॉक्टरांचा सन्मान; रुग्ण-डॉक्टर नात्याला मिळाली नवी ओळख

## स्वर्गीय रेवन्नाथजी मोरे यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन

स्वर्गीय रेवणनाथजी मोरे साहेब आपल्यातून जाऊन आज दहा दिवस झाले. त्यांच्या दशक्रियाविधीच्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचा योग आला. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी नानांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल, त्यांच्या कार्याबद्दल आणि त्यांच्या आठवणींबद्दल मनोगत व्यक्त केले. प्रत्येकाचे मनोगत ऐकताना मन अक्षरशः भरून आले.

महेशभाऊ आणि माझी जुनी ओळख आहे; मात्र नानांच्या आजारपणाच्या निमित्ताने मोरे कुटुंबीयांना जवळून अनुभवण्याची संधी मिळाली. नाना आजारी पडल्यानंतर ॲड. सौरभजी मोरे आणि अपेक्षावहिनी यांची माझी भेट झाली. त्यावेळी ते संगमनेर येथे नानांवर उपचार करून घेऊन आले होते. त्यांनी नानांची वैद्यकीय फाईल मला दाखवली. त्यानंतर अपेक्षावहिनींनी महेशभाऊंशी फोनवरून माझे सविस्तर बोलणे करून दिले. त्यानंतर नानांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आणि डॉ. गौरव कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली उपचार सुरू झाले. याच काळात महेशभाऊंनी नानांच्या लिव्हर ट्रान्सप्लांटबाबतही चर्चा केली. मात्र नानांची प्रकृती आणि फिटनेस लक्षात घेता ते शक्य झाले नाही.

**महेशभाऊंनी त्यावेळी एकच गोष्ट सांगितली-**

नाना जास्तीत जास्त दिवस आमच्यात राहावेत, यासाठी तुम्ही शक्य ते सर्व प्रयत्न करा. **त्यांनी मला आणखी एक वाक्य सांगितले, जे आजही मनात**




**कायम आहे-** माझा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे. तुम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न करा. काही झाले तरी तुम्ही जबाबदार राहणार नाही, असे मी स्टॅम्पवर लिहून देतो.

या शब्दांमधून व्यक्त झालेला विश्वास माझी जबाबदारी आणखी वाढवणारा होता. त्यानंतर जवळपास दहा महिने नानांची सेवा आणि उपचार सुरू राहिले.

या काळात किमान पाच ते सहा वेळा नाना श्वसनाच्या अत्यंत गंभीर अवस्थेत हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. मात्र प्रत्येक वेळी उपचारानंतर ते पुन्हा बरे होऊन घरी गेले. या संपूर्ण प्रवासात डॉ. जनार्दन मोरे, ॲड. सौरभ मोरे, अपेक्षावहिनी, रोहिणी देवकर, रुपेश मोरे, उल्हास, आदित्य देवकर, अक्षय अमराळे यांच्यासह मोरे कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती नानांच्या काळजीसाठी सातत्याने उपस्थित होती. या काळात मला या कुटुंबाची एकजूट, आपुलकी आणि नानांवरील अपार प्रेम जवळून पाहायला मिळाले.

नानांना भेटण्यासाठी हॉस्पिटलमध्ये येणारे मित्र, नातेवाईक आणि आप्तेष्ट यांचीही मोठी गर्दी असायची. हॉस्पिटलमधील सिस्टर, डॉक्टर, स्वच्छता कर्मचारी आणि इतर कर्मचाऱ्यांना नाना त्यांच्या आवाजावरून ओळखत होते. उपचार करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीशी त्यांचे एक वेगळे नाते निर्माण झाले होते.

माणसाच्या आयुष्यात दोन महत्त्वाचे सोहळे असतात-एक जन्मसोहळा आणि दुसरा मृत्यूसोहळा. 'मृत्यूसोहळा' हा शब्द जरी कठोर वाटत असला, तरी नानांच्या अंत्यविधीपासून गेल्या दहा दिवसांत मोरे कुटुंबीयांना भेटण्यासाठी आलेल्या असंख्य व्यक्तींकडे पाहताना या शब्दाचा एक वेगळाच अर्थ जाणवला.

राजकीय, वैद्यकीय, वकिली, उद्योजक, धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रातील असंख्य मित्र, नातेवाईक व हितचिंतकांनी मोरे कुटुंबीयांची भेट घेऊन दुःखात सहभागी होत आपली संवेदना व्यक्त केली. आज दशक्रियाविधीच्या कार्यक्रमातील गर्दी आणि त्यामध्ये अकोले हॉस्पिटलच्या संपूर्ण टीमचा झालेला सन्मान पाहिला, तेव्हा मन खरोखरच भरून आले. दशक्रियाविधीच्या प्रसंगी डॉक्टर आणि हॉस्पिटल स्टाफचा सन्मान होणे ही अत्यंत वेगळी आणि भावनिक घटना आहे. या घटनेचा साक्षीदार होण्याचे भाग्य अकोले हॉस्पिटल आणि आमच्या संपूर्ण टीमला मिळाले, ही आमच्यासाठी निश्चितच अभिमानाची बाब आहे. माझ्या मते, अशा प्रसंगांमुळे रुग्ण, नातेवाईक आणि डॉक्टर यांच्यातील भावनिक दुरावा कमी होण्यास मदत होते. डॉक्टर म्हणजे केवळ उपचार करणारी व्यक्ती नसून, रुग्णाच्या कठीण काळात त्याच्यासोबत उभा राहणारा एक माणूस आहे, ही भावना अधिक दृढ होते.

**या प्रसंगातून एक विचार मनात आला की,**

हॉटेलमध्ये माणूस आनंदाच्या क्षणांसाठी जातो. मनसोक्त जेवण करतो, बिल भरतो आणि वेटरलाही टिप देतो. मात्र हॉस्पिटलमध्ये माणूस दुःख आणि चिंता घेऊन येतो. रुग्ण बरा झाला तरी उपचारासाठी झालेल्या खर्चाची चिंता मनात असते. त्यामुळे अनेकदा डॉक्टर आणि रुग्ण यांच्यामध्ये नकळत एक भावनिक दुरावा निर्माण होतो. परंतु नाना आणि मोरे कुटुंबीयांसोबतच्या दहा महिन्यांच्या प्रवासाने मला जाणवले की, विश्वास, आपुलकी आणि माणुसकी असेल तर डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील अंतर नक्कीच कमी होऊ शकते.

आज झालेला सन्मान माझा एकट्याचा नसून अकोले हॉस्पिटलची संपूर्ण टीम, सर्व डॉक्टर, नर्सिंग स्टाफ, हॉस्पिटल कर्मचारी आणि आमचे सर्व हितचिंतक यांना समर्पित आहे. दशक्रियाविधीमध्ये डॉक्टर आणि हॉस्पिटल स्टाफचा सन्मान होणे ही कदाचित पहिलीच घटना असावी. या सन्मानातून केवळ एका डॉक्टरचा गौरव झालेला नाही, तर डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील विश्वासाच्या नात्याचाही सन्मान झाला आहे, असे मला वाटते. विशेषतः अपेक्षा महेश मोरे वहिनींनी डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील दरी कमी करण्यासाठी दाखवलेला विश्वास, आपुलकी आणि सहकार्य याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

**दहा महिन्यांच्या या प्रवासात नानांनी आम्हाला खूप काही शिकवले-** नात्यांची किंमत, कुटुंबाची एकजूट, विश्वास आणि माणुसकी. आज नाना आपल्यात नाहीत, ही पोकळी कधीही भरून निघणार नाही. मात्र त्यांच्या आठवणी, त्यांचे प्रेम आणि त्यांनी जोडलेली माणसं कायम आपल्या सोबत राहतील. स्वर्गीय रेवणनाथजी मोरे यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि मोरे परिवाराला हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो.

भावपूर्ण श्रद्धांजली!

**– शब्दांकन : डॉ. प्रकाश वाकचौरे**
**संचालक, अकोले हॉस्पिटल**



शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# जागतिक हृदय दिनानिमित्त मेडिकव्हर हॉस्पिटलतर्फे भव्य ५ कि.मी. डॉक्टर मॅरेथॉन




युवावार्ता (प्रतिनिधी)

जागतिक हृदय दिनाचे औचित्य साधून मेडिकव्हर हॉस्पिटल, संगमनेर यांच्या वतीने हृदयविकाराबाबत जनजागृती आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी ५ कि.मी. डॉक्टर मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले. या मॅरेथॉनमध्ये संगमनेर व अकोले परिसरातील १०० हून अधिक डॉक्टरांसह मेडिकव्हर हॉस्पिटलचे डॉक्टर, अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले.

या उपक्रमाला इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA), नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (NIMA), संगमनेर तालुका जनरल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन (STGPA), इंडियन डेंटल असोसिएशन (IDA) आणि अकोले तालुका मेडिकल असोसिएशन (ATMA) यांचा सहभाग लाभला. यावेळी IMA अध्यक्ष डॉ. योगेश गेठे, NIMA अध्यक्ष डॉ. शरद गुंजाळ, STGPA अध्यक्ष डॉ. संदीप अरगडे, IDA अध्यक्ष डॉ. सागर गोपाळे आणि ATMA अध्यक्ष डॉ. संदीप कडलग उपस्थित होते. संगमनेर शहर पोलीस निरीक्षक समीर बारवकर व महामार्ग पोलीस निरीक्षक रावसाहेब बांबळे यांच्या उपस्थितीत मॅरेथॉनला सुरुवात झाली. मेडिकव्हर हॉस्पिटलच्या केंद्रप्रमुख डॉ. स्नेहल गायके यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमात विपणन व्यवस्थापक दीपक जाधव, कार्यसंचालन व्यवस्थापक सुजित गायकवाड यांच्यासह हॉस्पिटलच्या डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

मॅरेथॉनच्या पुरुष गटात डॉ. ऋषिकेश वाघोलीकर यांनी प्रथम, डॉ. दर्शन बंगाळ यांनी द्वितीय, तर डॉ. सतीश चासकर यांनी तृतीय क्रमांक मिळविला. महिला गटात डॉ. स्मिता संगोराम प्रथम, डॉ. संगीता गायकवाड द्वितीय, तर डॉ. मेघा सुखटणकर तृतीय ठरल्या. विजेत्यांना सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक देऊन गौरविण्यात आले. दरम्यान, ८ वर्षीय सिद्धांत चासकर यानेही मॅरेथॉनमध्ये सहभाग घेतल्याबद्दल त्याला विशेष पदक देऊन गौरविण्यात आले. ज्येष्ठ डॉक्टर डॉ. किशोर गाढवे यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

मॅरेथॉनमध्ये सहभागी डॉक्टरांसाठी मेडिकव्हर हॉस्पिटलच्या वतीने मोफत ईसीजी, २-डी इको व हृदयरोग तज्ज्ञांचा सल्ला उपलब्ध करून देण्यात आला. नियमित व्यायाम, धावणे, संतुलित आहार आणि शारीरिक सक्रियतेतून हृदयाचे आरोग्य जपण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# संगमनेर नगरपरिषदेला दोन नवीन अग्निशामक वाहनांना मिळाली प्रशासकीय मान्यता

## आ. अमोल खताळ यांच्या मागणीला यश - नगरसेविका साक्षी सुर्यवंशी



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- अग्निशमन व आपत्कालीन सेवांचे बळकटीकरण करण्यासाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान योजनेंतर्गत संगमनेर नगरपरिषदेला दोन नवीन अग्निशामक वाहने उपलब्ध करून देण्यास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. आमदार अमोल खताळ यांच्या माध्यमातून हा पाठपुरावा करण्यात आला असून, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी यांनी ही माहिती दिली.

संगमनेर शहराची वाढती लोकसंख्या, वाढते नागरीकरण तसेच शहरातील विविध भागांमध्ये निर्माण होणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीचा विचार करता नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागाची क्षमता वाढविण्याची मागणी नगरसेविका साक्षी सूर्यवंशी यांनी आमदार अमोल खताळ यांच्याकडे केली होती. त्यानंतर आमदार खताळ यांनी नगरविकास मंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे संगमनेर नगरपरिषदेसाठी नवीन अग्निशामक वाहने मंजूर करण्याची मागणी केली होती. आमदार खताळ यांच्या मागणीची दखल घेत महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान योजनेंतर्गत नगरपरिषदेसाठी दोन अग्निशामक वाहनांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे शहरातील आग, अपघात तसेच अन्य आपत्कालीन घटनांमध्ये तातडीने मदत पोहोचविण्याची नगरपरिषदेची क्षमता वाढणार आहे.

संगमनेर शहराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नवीन अग्निशामक वाहने उपलब्ध व्हावीत, यासाठी आमदार अमोल खताळ यांनी राज्याचे नगरविकास मंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी केली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने दोन अग्निशामक वाहनांना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यामुळे नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत अधिक सक्षम आणि जलद अग्निशमन सेवा उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याचे नगरसेविका साक्षी सुर्यवंशी यांनी सांगितले.

# मराठी शाळेतील मुलांना तात्काळ सेवा सुविधा द्या - ग्राहक पंचायत



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले आदिवासी तालुक्यातील मराठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बऱ्याच गावातील मोडकळीस आलेल्या वर्ग खोल्या दुरुस्ती करून व नविन वर्ग इमारत खोल्या, पिण्याचे पाणी, विज, स्वच्छता गृह इत्यादी सुविधा विद्यार्थ्यांना तात्काळ मिळण्याबाबतचे निवेदन पंचायत समिती अकोले गटशिक्षण अधिकारी दिपक धुमाळ यांना दिल्याची माहिती ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, माधवराव तिटमे, सचिव राम रुद्रे यांनी दिली.

निवेदनात पुढे म्हटले आहे की अकोले हा आती दुर्गम आदिवासी तालुका असून पावसाळ्यात बऱ्याच ठिकाणी शाळेतील इमारतीच्या छताची गळती, काही ठिकाणी विद्यार्थी आहे पण शिक्षक कमी, अशा ठिकाणी तात्काळ शिक्षक देण्याची मागणी करण्यात आली. पिण्याचे पाणी, विज, स्वच्छतागृह मुलामुलींसाठी स्वतंत्र तसेच सोलर लाईट, सीसीटीव्ही कॅमेरे, वाचनालय, क्रीडांगण व साहित्य,संरक्षण भिंत इत्यादी पायाभुत सुविधांचा प्रश्न मोठ्या प्रमाणात जानवत आहे. काही ठिकाणी शासनाच्या इमारती ऐवजी इतर खाजगी इमारतींमध्ये व उघड्यावर भरत असलेले शाळेचे वर्ग, बऱ्याच मुला मुलींना पाठ्य पुस्तके अद्यापही उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे शिक्षण घेताना गरीब, सर्व सामान्य वंचित अपंग मुला मुलींची गैरसोय निराशाचे वातावरण निर्माण झाले असून त्यामुळे विद्यार्थी संख्याही तालुक्यामधील सर्व शाळेंमध्ये कमी होत चालली आहे. मराठी शाळेतील विद्यार्थ्यांना तात्काळ सुविधा मिळण्यास निवेदनात म्हटले आहे. निवेदनावर ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलीक, ग्राहक पंचायतचे मार्गदर्शक महेश नवले, माधवराव तिटमे, सचिव राम रुद्रे, ज्ञानेश्वर पुंडे, अध्यक्ष दत्ता शेनकर, रामदास पांडे, राजाराम वाकचौरे, संतोष गिते, अनंत घाणे, गंगाराम धिंदळे, गणपत थिगळे, रामदास पवार, अशोक उघडे, राजेंद्र लहामगे, कैलास येलमामे, पांडुरंग पथवे, भाऊसाहेब वाकचौरे, रामहारी तिकांडे, भाऊसाहेब गोर्डे, प्रकाश कोरडे, प्रमोद मंडलीक, नवनाथ आवारी दत्ता ताजणे, सुदाम मंडलीक आर्दिच्या सहया आहे.

# जिल्हास्तरीय हँडबॉल स्पर्धेत स्ट्रॉबेरी स्कूलच्या मुलींचे उल्लेखनीय यश



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहमदनगर, तालुका क्रीडा अधिकारी कार्यालय, संगमनेर तसेच अहमदनगर जिल्हा हँडबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने श्रमिक कनिष्ठ महाविद्यालय, संगमनेर येथे आयोजित जिल्हास्तरीय हँडबॉल स्पर्धेत स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूलच्या १७ वर्षांखालील मुलींच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावून उपविजेतेपद मिळविले.

स्पर्धेदरम्यान स्ट्रॉबेरी स्कूलच्या खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळ, जिद्द आणि आत्मविश्वासाचे दर्शन घडवत उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या या कामगिरीमुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशात आणखी एका मानाचा तुरा रोवला गेला आहे. या स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर तन्वी कांगणे आणि पौर्णिमा खटवा या दोन गुणवान खेळाडूंची विभागीय स्तरावरील हँडबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल शाळेच्या वतीने विशेष कौतुक करण्यात आले. या यशाबद्दल शाळेच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. संज्योत वैद्य यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून त्यांना विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रालाही शाळेत विशेष प्रोत्साहन दिले जाते, असे त्यांनी नमूद केले. शाळेचे प्राचार्य, शिक्षकवृंद, क्रीडा विभाग तसेच पालकांनीही विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले. विद्यार्थिनींना मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक फैजान आत्तार यांच्या योगदानाचेही शाळेच्या वतीने कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्रालाही शाळेत विशेष प्रोत्साहन दिले जाते. तन्वी कांगणे व पौर्णिमा खटवा या दोन्ही खेळाडू विभागीय स्तरावरही उत्कृष्ट कामगिरी करून शाळेचे नाव उज्ज्वल करतील, असा विश्वास शाळेच्या वतीने व्यक्त करण्यात आला. स्ट्रॉबेरी इंग्लिश मीडियम स्कूलच्या या यशाबद्दल क्रीडाप्रेमी, पालक व शिक्षण क्षेत्रातून विद्यार्थिनींचे अभिनंदन होत आहे.

# साईप्रसाद कंपनीचा शेतकरी सन्मान सोहळा उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

साकूर - संगमनेर तालुक्यातील साकूर येथे साईप्रसाद व्हेजिटेबल कंपनी व सप्लायर्स यांच्या वतीने शेतकरी सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. वर्षभर कंपनीला भाजीपाला व शेतमालाचा भरभरून प्रतिसाद देणाऱ्या शेतकरी आणि व्यापाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

साकूर परिसरातील शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाच्या विक्रीसाठी संगमनेर, चाकण, नारायणगाव यांसारख्या बाजारपेठांमध्ये जावे लागत होते. त्यामुळे वाहतूक खर्चाबरोबरच वेळ आणि श्रमही मोठ्या प्रमाणात खर्च होत होते. मात्र, साकूरमध्येच भाजीपाला खरेदी-विक्रीचा व्यवसाय सुरू झाल्याने शेतकऱ्यांची मोठी गैरसोय दूर झाली आहे. आता शेतमाल स्थानिक पातळीवरच विक्री करता येत असल्याने शेतकऱ्यांच्या वेळेची व वाहतूक खर्चाची बचत होणार आहे.

गेल्या वर्षभरात साकूर परिसरातील शेतकऱ्यांनी साईप्रसाद व्हेजिटेबल कंपनीच्या व्यवसायाला चांगला प्रतिसाद दिला. या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कंपनीच्या वतीने शेतकरी आणि व्यापाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यापुढेही शेतकऱ्यांनी असाच प्रतिसाद दिल्यास त्यांच्या शेतमालाला योग्य भाव देण्यासाठी प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही कंपनीच्या वतीने देण्यात आली.

शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून योगेश शेठ ढेंबरे, सतीश शेठ भोसले, राहुल शेठ ढेंबरे, विलास शेठ ढेंबरे आणि बंडू शेठ बारवे यांनी साकूर येथेच हा व्यवसाय उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला. स्थानिक पातळीवर शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध करून देणाऱ्या या उपक्रमाचे शेतकरी वर्गातून स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमास माजी सभापती अजय फटागरे, थोरात कारखान्याचे संचालक इंद्रजीत पाटील खेमनर, भाजपचे तालुकाध्यक्ष गुलाब राजे भोसले, लहाणू पाटील खेमनर, चेअरमन भाऊसाहेब डोलनर, माजी चेअरमन रुपेश पाटील धुळगंड, बांधकामगार तालुका अध्यक्ष जयराम ढेरंगे, भगवान उद्योग समूहाचे संस्थापक-अध्यक्ष आदिकराव खेमनर, साहेबराव बारवे, योगेश खेमनर, अझर पटेल, अनमोल पाटील खेमनर, युवा नेते बाळासाहेब सागर यांच्यासह शेतकरी, व्यापारी, प्रतिष्ठित नागरिक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

साकूरसह परिसरातील शेतकऱ्यांना स्थानिक बाजारपेठ, शेतमालाला योग्य मोबदला आणि विक्रीसाठी होणाऱ्या धावपळीपासून दिलासा मिळत असल्याने साईप्रसाद व्हेजिटेबल कंपनीच्या या उपक्रमाचे शेतकरी वर्गातून कौतुक होत आहे.

# हर्षदा लांडगे प्रवरा क्रीडारत्न पुरस्काराने सन्मानित



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - आनंदगड पोलिटेक्निकबकॉलेजमध्ये प्रथम वर्षात शिक्षण घेत असलेल्या व वडगाव लांडगा येथील आदर्श इंलिश स्कुल मध्ये शिक्षण पूर्ण केलेल्या हर्षदा नानासाहेब लांडगे या खेळाडूचा कराटे, बॉक्सिंग व टग ऑफ वॉर मध्ये राज्यपातळीवर यश संपादन केल्या बद्दल प्रवरा क्रीडा रत्न पूरस्काराने सन्मानित करण्यात आले.

लोकनेते पदमभूषण डॉ.बाळासाहेब विखे प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या वतीने अहिल्यानगर जिल्ह्यातील गेल्या तीन वर्षात राष्ट्रीय व राज्य पातळीवर यश मिळविलेल्या खेळाडूंचा प्रवरा क्रीडा रत्न पुरस्कार सोहळा संपन्न झाला.यावेळी हर्षदा नानासाहेब लांडगे हिचा प्रवरा क्रीडा रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील,माजी खासदार सुजय विखे पाटील,सौ सुश्मिता विखे,जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे,क्रीडा क्षेत्रातील मान्यवर,पालक,खेळाडू उपस्थित होते.

हर्षदा नानासाहेब लांडगे हिने २०२३- २४ मध्ये कराटे,२०२४-२५ मध्ये बॉक्सिंग व २०२५-२६ .मध्ये टग ऑफ वॉर मध्ये राज्यपातळीवर यश संपादन केले होते.तिला क्रीडा मार्गदर्शक सार्थक लांडगे व मल्हारी चोरमल यांचे मार्गदर्शन लाभले. हा सन्मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल तिचा आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेजच्या वतीने सतकार करण्यात आला.आनंदगड शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, सचिव डॉ.अनिल रहाणे, संचालिका सौ. सुप्रियाताई वाकचौरे, सौ. गीताताई रहाणे, शिवराज वाकचौरे, अक्षय रहाणे, सौ. प्रतीक्षा रहाणे, प्राचार्या डॉ. पल्लवी फलके, प्राचार्य डॉ. किरण चौधरी, आनंदगड पॉलीटेक्निक चे समन्वयक विद्याचंद्र सातपुते, प्राचार्य विनोद गिरी, आदर्श इंग्लिश स्कुल वडगाव लांडगा चे मुख्याध्यापक आर. आर. कानवडे, एम डी भोर, आनंदगड शैक्षणिक संकुलाचे सर्व प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

# नेपाळमध्ये पुन्हा भयानक आपत्ती

## पर्वताचा कडा कोसळला, १४ जणांचा मृत्यू

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

नेपाळच्या मुस्तांग जिल्ह्यात मुसळधार पावसात डोंगराचा महाकाय भाग कोसळून कालीगंडकी नदीत पडला. नदीचा मार्ग लगेचच ढिगाऱ्यांनी भरून गेला. एका व्हायरल व्हिडिओमध्ये काही सेकंदातच उतारावरून दगड आणि चिखल खाली कोसळताना दिसत आहे. या भागातील पूर आणि भूस्खलनामुळे आतापर्यंत १४ जणांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, पुराचे पाणी वाढल्याने नारायण नदीला बांधलेल्या एका क्रूझ जहाजाचे दोर तुटले. त्यानंतर ते जहाज सुमारे १०० मीटर वाहून गेले आणि एका पुलाच्या खांबाला धडकले. नेपाळ एका महिन्यात दुसऱ्यांदा आलेल्या भीषण पुराचा सामना करत आहे. २६ ऑगस्ट रोजी भोटेकोशी नदीला आलेल्या पुरात १,४५३ लोकांचा मृत्यू झाला होता, तर ५,५०० हून अधिक लोक अजूनही बेपत्ता आहेत.राष्ट्रीय आपत्ती जोखीम निवारण आणि व्यवस्थापन प्राधिकरणाच्या माहितीनुसार, गेल्या २४ तासांत नेपाळच्या विविध जिल्ह्यांमध्ये पूर, भूस्खलन आणि अतिवृष्टीशी संबंधित २७२ घटना घडल्या. या घटनांमध्ये २१ जणांचा मृत्यू झाला, ४ जण बेपत्ता झाले आणि २६ जण जखमी झाले. भूस्खलनाच्या सर्वाधिक ९७ घटना घडल्या असून, त्यात १९ जणांचा मृत्यू झाला, ४ जण बेपत्ता झाले आणि ४ जण जखमी झाले.राष्ट्रीय आपत्ती जोखीम निवारण आणि व्यवस्थापन प्राधिकरणाच्या माहितीनुसार, गेल्या २४ तासांत नेपाळच्या विविध जिल्ह्यांमध्ये पूर, भूस्खलन आणि अतिवृष्टीशी संबंधित २७२ घटना घडल्या. या घटनांमध्ये २१ जणांचा मृत्यू झाला, ४ जण बेपत्ता झाले आणि २६ जण जखमी झाले.

# संपादकीय...

## अण्वस्त्र निर्मूलन: मानवी अस्तित्व आणि पृथ्वीवरील सजीव सृष्टीचे रक्षण

आंतरराष्ट्रीय अण्वस्त्र निर्मूलन दिन हा दिवस २६ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवसाचे उद्दिष्ट जगातील सर्व अण्वस्त्रांचा पूर्णपणे नाश करून शांतता आणि सुरक्षितता निर्माण करणे आहे. अण्वस्त्रांचा धोका हा मानवी अस्तित्वासाठी सर्वात मोठ्या धोक्यांपैकी एक आहे, आणि त्याचा वापर विनाशकारी परिणाम करू शकतो. संयुक्त राष्ट्रांनी हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश अण्वस्त्रांच्या निर्मूलनासाठी जागरूकता निर्माण करणे आणि आंतरराष्ट्रीय समुदायाला या धोक्याचा सामना करण्यासाठी एकत्र आणणे आहे. अण्वस्त्रांची शर्यत थांबवणे, या शस्त्रांच्या वाढीस प्रतिबंध करणे, आणि अण्वस्त्रविरहित जगाची उभारणी करणे हे या दिवसाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या दिवसाद्वारे अण्वस्त्रांच्या वापराचे गंभीर परिणाम लोकांसमोर आणले जातात आणि शांततापूर्ण उपाययोजनांसाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले जाते. दरवर्षी २६ सप्टेंबर हा दिवस अण्वस्त्रांच्या संपूर्ण निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय दिवस म्हणून पाळला जातो. अण्वस्त्र निर्मूलन म्हणजे काय? तर जगातून सर्व अण्वस्त्रे- अणुबॉम्ब आणि घातक आण्विक शस्त्रास्त्रे पूर्णपणे नष्ट करणे म्हणजेच अण्वस्त्र निर्मूलन होय. १) मानवी जीवितहानी, २) पर्यावरणाचा विनाश आणि ३) जागतिक सुरक्षा धोक्यात येऊ नये. म्हणून संयुक्त राष्ट्र- युएन व विविध देश नि:शस्त्रीकरणाचा प्रचार करतात. पार्श्वभूमी आणि इतिहास: संयुक्त राष्ट्रांनी सन २०१३ मध्ये ठराव मंजूर करून २६ सप्टेंबर हा दिवस अण्वस्त्र निर्मूलन दिन म्हणून घोषित केला. सन १९४५ मध्ये जपानमधील हिरोशिमा आणि नागासाकी शहरांवर झालेल्या अणुबॉम्ब हल्ल्याच्या भीषण परिणामानंतर जगात अण्वस्त्रांविरोधात मोठी जाणीव निर्माण झाली. सद्यस्थितीत जागतिक अण्वस्त्र साठा असा- जगात सध्या ९ देशांकडे अण्वस्त्रे आहेत. रशिया आणि अमेरिका यांच्याकडे जगातील सर्वाधिक सुमारे ८६% अण्वस्त्रे आहेत. भारताकडे सुमारे १९० अण्वस्त्रे असून भारताचे धोरण आधी अण्वस्त्र वापरणार नाही- No First Use यावर आधारित आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर अणुयुगाचा प्रारंभ झाला, जेव्हा अनेक देशांनी अण्वस्त्रांची स्पर्धा सुरू केली. सुरुवातीला, शीतयुद्धाच्या भू-राजकारणाच्या परस्परपूरक संदर्भात आणि प्रभावी आंतरराष्ट्रीय नि:शस्त्रीकरण धोरणांच्या अभावामुळे, अमेरिका, सोव्हिएत संघ, युनायटेड किंगडम, फ्रान्स आणि चीनसारखे देश सन १९४५-१९६४ दरम्यान अण्वस्त्रधारी शक्ती बनले. कॅट्झ २००८ ; शेंक आणि युमन्स २०१२ या काळात जगभरातील सर्व वातावरणांमध्ये- वातावरण, जमिनीखाली आणि पाण्याखाली मोठ्या संख्येने अणुचाचण्या घेण्यात आल्या. याच काळात अमेरिका आणि सोव्हिएत संघाने वातावरणात मोठ्या संख्येने अणुचाचण्या केल्या. याची सर्वात प्रातिनिधिक उदाहरणे म्हणजे सन १९५४ मध्ये अमेरिकेने मार्शल बेटांवरील बिकिनी प्रवाळद्वीपावर कॅसल ब्राव्हो चाचणी आणि सन १९६१ मध्ये सोव्हिएत संघाने उरल पर्वतांच्या उत्तरेकडील नोव्हाया झेम्लिया द्वीपसमूहात सत्सार चाचणी केलेले हायड्रोजन बॉम्बचे पहिले अणुस्फोट- गुडबी २००५ घडविले. वातावरणात आतापर्यंत झालेल्या सर्वात शक्तिशाली अणुचाचण्यांमुळे झालेले गंभीर पर्यावरणीय नुकसान, तसेच जागतिक अणुशस्त्र चाचण्यांच्या सर्वसाधारण पार्श्वभूमीने, अणुशस्त्र चाचण्या पूर्णपणे बंद करण्यासाठी मोठ्या प्रमाणावरील आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या पहिल्या टप्प्यासाठी पाया तयार केला आहे. अशाप्रकारे सन १९६३ हे वर्ष मर्यादित चाचणी बंदी कराराच्या- एलटीबीटी अंमलात येण्याने एक महत्त्वाचा टप्पा ठरले. या करारानुसार भूमिगत भाग वगळता जगातील सर्व वातावरणात अणुशस्त्र चाचण्यांवर बंदी घालण्यात आली होती - रुबिन्सन २०११. जरी फ्रान्स आणि चीन या दोन प्रमुख देशांनी या करारावर स्वाक्षरी केली नसली तरी- मास्टनी २००८, कारण या देशांनी वातावरणात त्यांच्या अणुशस्त्र चाचण्या सुरूच ठेवल्या होत्या, तरीही सन १९६३ पासून दोन्ही गोलार्धांतील वातावरणातील किरणोत्सर्गी समस्थानिकांना मर्यादित ठेवण्यात या कराराचा खरा प्रभाव पडला-लेविन इत्यादी तसेच मॅनिंग आणि मेलहुइश १९९४. सन १९६८ मध्ये अण्वस्त्र प्रसारबंदी करार- एनपीटी लागू होणे, ज्याने पाच विद्यमान अणुशक्ती असलेल्या देशांना वगळून जगातील सर्व देशांना अण्वस्त्रधारी बनण्यावर बंदी घातली, अण्वस्त्रांची स्पर्धा आणि अप्रत्यक्षपणे अण्वस्त्र चाचण्या संपवण्याच्या प्रयत्नांमधील हा आणखी एक महत्त्वाचा क्षण होता- व्हॅन डर मीर २०११. जरी या करारातील तरतुदींची अंमलबजावणी आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेच्या- आईएईए मदतीने होणार होती- वेट्झ २०११, तरी गेल्या चार दशकांतील भू-राजकीय अनुभवांनी हे दाखवून दिले आहे की एनपीटीच्या कक्षेबाहेर, भारत, दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान, उत्तर कोरिया आणि वरवर पाहता इस्त्रायल- अनिर्दिष्ट अणुस्थिती यांचा समावेश असलेल्या अण्वस्त्रधारी देशांची एक वेगळी श्रेणी उदयास आली आहे.

# रोटरी क्लब अकोले सेंट्रल व लालतारा मेडिकलचा उपक्रम



युवावार्ता (प्रतिनिधी)

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत कामाच्या व्यापामुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, शेतमजूर व कामगारांकडून आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष होते. रक्तदाब व मधुमेहासारख्या आजारांचे वेळीच निदान व्हावे, या उद्देशाने रोटरी क्लब अकोले सेंट्रल व लालतारा मेडिकल यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या मोफत रक्तदाब व मधुमेह तपासणी अभियानास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

गणेशोत्सव ते नवरात्रोत्सव या कालावधीत बाजारतळाशेजारील लालतारा मेडिकलसमोरील प्रांगणात हे अभियान सुरू आहे. गेल्या पाच दिवसांत जवळपास ३०० नागरिकांनी या मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला असून, दररोज सरासरी ५० ते ६० नागरिकांची तपासणी केली जात आहे. नागरिकांकडून या वैशिष्ट्यपूर्ण आरोग्य उपक्रमाचे कौतुक होत आहे.

रक्तदाब व मधुमेह हे आजार अनेकदा सुरुवातीच्या काळात स्पष्ट लक्षणे न दाखवता शरीरावर परिणाम करीत असतात. त्यामुळे नियमित आरोग्य तपासणी करून संभाव्य धोके वेळीच ओळखणे आवश्यक आहे. याच उद्देशाने रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२चे प्रांतपाल जयेशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण १३ जिल्ह्यांत हे अभियान राबविण्यात येत आहे. रोटरी क्लब अकोले सेंट्रलने या अभियानाची अकोले येथे प्रभावी अंमलबजावणी सुरू केली असून, अकोले-संगमनेर तालुक्यातील लालतारा मेडिकलने या उपक्रमासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. गणेशोत्सव काळात या अभियानाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर नागरिकांनी मोठ्या संख्येने तपासणी करून घेतली आहे.

कामाच्या व्यापामुळे किंवा आरोग्यविषयक आवश्यक माहितीच्या अभावामुळे अनेक नागरिक नियमित तपासणीपासून दूर राहतात. अशा नागरिकांना आपल्या आरोग्याची प्राथमिक तपासणी सहज व विनामूल्य करता यावी, हा या अभियानामागील प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, शेतमजूर व कामगारांनी या अभियानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

रोटरी क्लब अकोले सेंट्रलचे अध्यक्ष गंगाराम करवर, सेक्रेटरी सचिन आहेर, उपाध्यक्ष संदीप भोर, सहसचिव परमानंद शिंदे, खजिनदार प्राचार्य डॉ. संजय ताकटे, पब्लिक इमेज डायरेक्टर ह.भ.प. दीपक महाराज देशमुख, डिस्ट्रिक्ट टीआरएफ असोसिएट डायरेक्टर प्राचार्य विद्याचंद्र सातपुते तसेच रोटरी क्लबचे सर्व पदाधिकारी व सदस्य आणि लालतारा मेडिकलचे संचालक सचिन आवारी यांनी नागरिकांना या मोफत तपासणी अभियानाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी रोटरी क्लबचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणाऱ्या या उपक्रमाला समाजातून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

# जिल्हास्तरीय आदर्श केंद्रप्रमुख पुरस्कार मिळाल्याबद्दल बाळासाहेब जाधव यांचा सत्कार



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धांदरफळ केंद्राचे केंद्रप्रमुख बाळासाहेब रामभाऊ जाधव यांना सन २०२६-२७ चा जिल्हास्तरीय आदर्श केंद्रप्रमुख पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल जिल्हा परिषद शाळा डेरेवाडी तसेच ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत श्री. जाधव यांना हा पुरस्कार मिळाल्याने डेरेवाडी गावाच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी, शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी तसेच शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेल्या कार्याबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले.

या सत्कार समारंभास स्कूल कमिटीचे अध्यक्ष प्रदीप डेरे यांच्यासह पुंजा डेरे, सोमनाथ डेरे, जयदेव डेरे, अशोक डेरे, जालिंदर डेरे, एकनाथ डेरे, ओंकार डेरे, चेतन गोर्डे, सौ. श्वेता डेरे, सविता डेरे, इंदुताई, मालती डेरे आणि पुनम डेरे यांची उपस्थिती होती.

तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डेरेवाडीचे मुख्याध्यापक कोते व मेहेत्रे हे देखील या कार्यक्रमास उपस्थित होते. उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांनी श्री. बाळासाहेब जाधव यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आजोबांच्या स्मरणार्थ नातवाची सामाजिक बांधिलकी वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी ३१ हजारांची मदत!

युवावार्ता (प्रतिनिधी)

कै. कोंडाजी दगडू शेळके यांच्या स्मृती चिरंतन जपताना, त्यांचे नातू, प्रसिद्ध औषध विक्रेते व तरुण उद्योजक हर्षल खेमनर (आश्वी बु.) यांनी रयत शिक्षण संस्थेच्या येथील न्यू इंग्लिश स्कूलमधील वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी ३१ हजार रुपयांची देणगी देत संवेदनशीलतेचे अनोखे दर्शन घडवले आहे. आगामी हिवाळ्याच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना झोपण्याच्या साहित्याची व्यवस्था व्हावी म्हणून त्यांनी तातडीने हा मदतीचा हात पुढे केला.

मागील आठवड्यात वसतिगृहातील काही विद्यार्थी आजारी पडल्याची माहिती मिळताच हर्षल खेमनर यांनी डॉक्टरांसमवेत जाऊन औषधोपचार पुरवत विद्यार्थ्यांची विचारपूस केली होती. या भेटीदरम्यान विद्यार्थी थंड फरशीवर झोपत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. आगामी काळात थंडीचा कडाका वाढणार असल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात येऊ नये, या भावनेतून त्यांनी तात्काळ विद्यालयाचे प्राचार्य, पर्यवेक्षक व वसतिगृह प्रमुखांशी संवाद साधला.

विद्यार्थ्यांना कॉट व बिछान्यांची गरज असल्याचे लक्षात येताच खेमनर यांनी क्षणाचाही विलंब न लावता ३१ हजार रुपयांचा निधी शालेय प्रशासनाकडे सुपूर्त केला. स्वतःच्या आजोबांच्या स्मरणार्थ नातवाने थेट गरजू विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी निगडित मूलभूत गरजेसाठी दिलेली ही देणगी शैक्षणिक वर्तुळात कौतुकाचा विषय ठरली आहे.



न्यू इंग्लिश स्कूलच्या ज्युनिअर कॉलेज इमारतीच्या भूमिपूजन सोहळ्यात रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी तसेच विभागीय अध्यक्ष आमदार रोहित पवार यांच्या हस्ते हर्षल खेमनर यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

आजोबांच्या स्मृती जपताना संवेदनशीलतेने घेतलेला हा पुढाकार परिसरातील तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत असून आश्वी परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. दरम्यान, वसतिगृहातील विद्यार्थ्यांना अधिक सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी समाजातील दानशूर व्यक्ती, उद्योजक व माजी विद्यार्थ्यांनी पुढे येऊन हातभार लावावा, असे आवाहन शालेय प्रशासन व स्थानिक स्कूल कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

पान १ वरून

# तमाशाच्या बदलत्या...

या आणि अशा अनेक प्रश्नांचा वेध घेण्यासाठी संगमनेरमध्ये विशेष प्रकट मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे.

सत्यशोधक विचार मंचाच्या वतीने रविवारी (दि. ४ ऑक्टोबर) सायंकाळी ६ वाजता व्यापारी असोसिएशन हॉल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ, संगमनेर येथे पद्मश्री रघुवीर खेडकर आणि त्यांच्या धाकट्या भगिनी मंदाराणी खेडकर यांची प्रकट मुलाखत आयोजित करण्यात आली आहे. तमाशा ही केवळ मनोरंजनाची कला नसून महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीशी जोडलेली समृद्ध परंपरा आहे. मात्र बदलते मनोरंजनाचे माध्यम, वाढता खर्च, प्रेक्षकांच्या बदललेल्या आवडी आणि कलावंतांसमोरील आर्थिक आव्हाने यामुळे या लोककलेसमोर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. तमाशाच्या फडामागचे वास्तव, कलावंतांचे कष्ट, त्यांच्या जगण्याचा संघर्ष, ग्रामीण भागातील प्रेक्षकांचा प्रतिसाद आणि बदलत्या काळात तमाशा कसा टिकून आहे, याबाबत या मुलाखतीतून प्रत्यक्ष अनुभव ऐकायला मिळणार आहेत. मुंबईचे मुक्त पत्रकार आणि राष्ट्र सेवा दलाचे प्रदेशाध्यक्ष राजा कांदळकर हे रघुवीर खेडकर व मंदाराणी खेडकर यांची मुलाखत घेणार आहेत. त्यामुळे तमाशाच्या रंगमंचामागील जीवन, कलावंतांचा संघर्ष आणि या लोककलेच्या वर्तमान व भविष्याचा वेध घेणारा हा संवाद ठरणार आहे. तमाशा कलावंतांचे जग जवळून समजून घेण्यासाठी तसेच महाराष्ट्राच्या लोककलेच्या वर्तमान स्थितीवर विचारमंथन करण्यासाठी संगमनेरकरांनी या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन सत्यशोधक विचार मंचाच्या वतीने करण्यात आले आहे.


CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
Balaso Mahadev Gavade
NEW NAME AS,
Balasaheb Mahadev Gavade
I hereby declare that Balasaheb Mahadev Gavade and Balaso Mahadev Gavade are one and the same person.
Address: Lakhanagaon, Taluka Ambegaon, District Pune, MaharashtraPIN Code: 412406

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
SHAIKH ZAHIRUDDIN AMINODDIN .
NEW NAME AS,
ZAHIRUDDIN AMINUDDIN SHAIKH .
ADRESS - 56,SUBEDHAR WADA, NEAR AKHADA MASJID, OPP DED COLLEGE, NAIKWADIPURA, SANGAMNER 422605

नावात बदल
जुने नाव -
बाळासो महादेव गावडे
नवीन नाव -
बाळासाहेब महादेव गावडे
दोन्ही नावाच्या व्यक्ती एकच आहे
पत्ता : लाखणगाव, ता. आंबेगाव, जिल्हा- पुणे, पिन कोड -412 406

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
MINAJ GULAB PATHAN
NEW NAME AS
MINAJBANO SHAGIR KAJI
ADD - KOTUL, POST KOTUL, TAL-AKOLE, DIST, AHMEDNAGAR, 422610,

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
PRIYANKA SOMESHWAR DIWATE
TO NEW NAME
PRIYANKA SOMESHWAR DIVATE
BY AFFIDAVIT NO 1260/2026
DATE- 29/09/2026
ADD- LANE NO.1, SHIVAJI NAGAR, OPP MARKET YARD,SANGAMNER, AHILAYANAGAR,422605

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

जागा भरणे आहे
ऑफिस बॉय
ऑफिस क्लार्क
महिला किंवा पुरूष
इलेक्ट्रॉनिक मशिनरी चालविणेचा अनुभव असलेला कारागीर
वॉचमेन
अनुभवास प्राधान्य
- संपर्क -
9822334431











पाहिजेत
नॅशनल मेडीकल हॉस्पिटल ऑफ आयुर्वेदिक सायन्स
वेल्हाळे, ता. संगमनेर
पंचकर्म थेरापिस्ट
पुरूष–१/ स्त्री –१
आकर्षक पगार
9370071777
8806292948

पाहिजेत
दुकान कामासाठी होतकरू मुलगा पाहिजे - २ जागा
आकर्षक पगार
राजा ड्रेसेस
बाजारपेठ, ता. संगमनेर, जि. अ.नगर
8275191096

स्टोन क्रशर उद्योगासाठी पाहिजेत
अकाऊंटंट मॅनेजर
अकाऊंटस व फायनान्स क्षेत्रातील अनुभव असलेले उमेदवारास प्राधान्य
Tally, GST, Accounting, MIS Report चे ज्ञान आवश्यक
टिम हाताळण्याची क्षमता असावी
पगार - २०,००० ते २५,००० प्रति महिना (अनुभवानुसार आकर्षक वेतन)
इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा
पत्ता : स्टोनेक्स सेल्स अँड रिफॉर्म्स, धुळवड, ता. सिन्नर
- संपर्क -
सांगळे साहेब - 9850194463 9503947084

# रतनगडावर K.A. ग्रुपतर्फे स्वच्छता



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - क्रांतिकारी आदिवासी युवा प्रतिष्ठान के.ए. ग्रुप, अकोले तालुका यांच्या नेतृत्वाखाली रविवार, २७ सप्टेंबर २०२६ रोजी आद्यक्रांतिकारक राघोजी भांगरे यांचे प्रेरणास्थान असलेल्या रतनगडावर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या स्वच्छता मोहिमेदरम्यान रतनगड परिसरातील प्लास्टिक व इतर कचरा गोळा करून त्याची व्यवस्थित विल्हेवाट लावण्यात आली. आद्यक्रांतिकारक राघोजी भांगरे, छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयघोषाने मोहिमेला सुरुवात करण्यात आली. स्वच्छ किल्ले, सुंदर भविष्य हे उद्दिष्ट मनाशी ठेवून रतनगडाचा ऐतिहासिक वारसा, निसर्गसौंदर्य आणि परिसराची स्वच्छता जपण्याचा संदेश या मोहिमेतून देण्यात आला.

या मोहिमेत के.ए. ग्रूप अकोले तालुक्याचे अध्यक्ष राहुल भाऊ वळे, उपाध्यक्ष वैभव भाऊ गोंदके, सचिव आदित्य भाऊ लोहकरे, सल्लागार विशाल भाऊ गोंदके, कार्याध्यक्ष सुनील भाऊ कोकतरे, संपर्क प्रमुख विजय भाऊ पिचड तसेच घ.-. ग्रुपचे सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्वच्छता मोहिमेस वनरक्षक गवळी साहेब, वनपाल गांगुर्डे साहेब, वनमजूर शिवाजी झडे, कुंडलिक तातळे, विठ्ठल इदे, गणेश झडे, महादू झडे, विष्णू झडे, बहिरू लोटे, बाळू झडे, पंढरीनाथ पांढरे आणि काळू झडे यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. ऐतिहासिक वारसा जपूया, किल्ले स्वच्छ ठेवूया हा संदेश देण्यात आला.

# ‘पैशांचा पाऊस’ पाडण्याचे आमिष; बनावट नोटा टोळीचा पर्दाफाश

## बारामतीच्या तिघांना अटक; बनावट नोटांसह १ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त



युवावार्ता(प्रतिनिधी) : संगमनेर - अंधश्रद्धेचा आधार घेत नागरिकांना ‘पैशांचा पाऊस पाडून श्रीमंत करून देतो’ असे आमिष दाखवून त्यांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पुणे जिल्ह्यातील बारामती येथील तिघांना अटक करण्यात आली असून, त्यांच्या ताब्यातून ५०० रुपयांच्या तब्बल १८ हजार ४१९ बनावट नोटा, पाच मोबाईल आणि व्हॉक्सवॅगन कार असा १ कोटी ३ लाख ७४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक जिल्ह्यातील अवैध धंद्यांची माहिति घेत असताना बनावट नोटा चलनात आणण्याच्या तयारीत असलेल्या टोळीबाबत पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विनायक कॉलनी, वडगाव रोड परिसरात सापळा रचून पोलिसांनी कारवाई केली.

या कारवाईत गणेश दिलीप शेवाळे (वय ३३, रा. अशोकनगर, बारामती), सुमित विकास चंदनशिवे (वय २५, रा. तांदुळवाडी, बारामती) आणि सुरज वसंत कांबळे (वय २७, रा. झारगडवाडी, बारामती) यांना ताब्यात घेण्यात आले.

आरोपींच्या घराची झडती घेतली असता जिन्याखाली ठेवलेल्या एका पिशवीत भारतीय चलनाच्या बनावट नोटांचा मोठा साठा आढळून आला. तसेच बनावट नोटा तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे कोरे कागदाचे बंडलही पोलिसांच्या हाती लागले. पोलिसांनी ५०० रुपयांच्या १८ हजार ४१९ बनावट नोटा, पाच मोबाईल आणि एमएच-१४-डीएफ-०३६५ क्रमांकाची व्हॉक्सवॅगन कार जप्त केली.

पोलिसांच्या प्राथमिक चौकशीत या टोळीच्या फसवणुकीचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आरोपी नागरिकांच्या मनात ‘पैशांचा पाऊस पाडून मोठी रक्कम मिळवून देतो’ अशी अंधश्रद्धा निर्माण करत. त्यानंतर विश्वास संपादन करून त्यांच्याकडून पैसे उकळण्यासाठी बनावट नोटांचा वापर केला जात असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणाच्या तपासात आणखी काही आरोपींचा सहभाग समोर आला आहे. प्रताप धुमाळ (रा. बोल्हेगाव, अहिल्यानगर), अशोक भीमराव दारकुंडे (रा. गजानन कॉलनी, एमआयडीसी, अहिल्यानगर) आणि ‘अम्मु’ (रा. मालेगाव, जि. नाशिक) हे सध्या फरार आहेत. आरोपींनी अशोक दारकुंडे याच्या फॉर्च्यूनर वाहनातून मालेगाव येथील ‘अम्मु’कडून २५ हजार रुपयांना बनावट नोटा आणल्याचे तपासात समोर आले आहे. फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे पथक तपास करीत आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ७९०/२०२६ दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १७९, १८०, ३१८(४), ३(५) तसेच महाराष्ट्र जादूटोणा प्रतिबंधक अधिनियमातील कलम ३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


# संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

## जाहीर निविदा सुचना क्र. १०

जा.क्रं. संनपा/बांध–१४/R/९७१/२०२६ दि. २९/०९/२०२६

संगमनेर नगरपरिषदे मार्फत करावयाच्या खालील कामासाठी बांधकाम विभागामार्फत ठेकेदारांकडुन मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सर्व अटी व शर्तीसह कोरे निविदा फॉर्म नगरपालिका कार्यालयात बांधकाम विभाग येथे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी दि-२९/०९/२०२६ ते दि ०६/१०/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा फॉर्म फी भरुन मिळु शकतील. मोहोरबंद निविदा दि -०७/१०/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वा. पर्यंत स्वीकारण्यात येतील. कामासंबंधी अटी व सविस्तर माहीती निविदा फॉर्मसोबत जोडणेत येईल. निविदे सोबत बयाणा रक्कम नगरपालिका कार्यालयात रोख स्वरुपात स्वीकारली जाईल. सदर रकमेवर कोणतेही व्याज देय असणार नाही. निविदे सोबत बयाणा रक्कम न भरल्यास निविदा अपात्र ठरविण्यात येईल व अशा अपात्र निविदेचा नगरपालिके कडुन विचार केला जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाणा रक्कम | निविदा फॉर्म फी | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | संगमनेर नगर परिषदेचे कचरा डेपो येथे दक्षिण बाजूस कंपाऊंड वॉलचे बांधकाम करणे. | ४,१५,५६०/- | ४,२००/- | ५००/- | ६ महिने |

टीप - प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि ०८/१०/२०२६ रोजी सायं. ५.३० वा निविदा समिती समोर निविदाधारक अथवा त्यांचे प्राधिकृत प्रतिनिधी यांचेसमक्ष उघडण्यात येतील. निविदेतील अटी व शर्ती न.पा. कार्यालय बांधकाम विभाग येथे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

(दयानंद गोरे)
मुख्याधिकारी
संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

(डॉ. मैथिली तांबे)
नगराध्यक्षा
संगमनेर नगरपरिषद, संगमनेर


# 'श्रीगणेशा आरोग्याचा’ अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## रघुनंदन मित्र मंडळाच्या आरोग्य तपासणी शिबिरात ७० हून अधिक रुग्णांची तपासणी




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या समन्वयाने रघुनंदन मित्र मंडळाच्या वतीने ‘श्रीगणेशा आरोग्याचा - आरोग्य अभियान २०२६’ अंतर्गत सामुदायिक आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. मंगळवार, दि. २२ सप्टेंबर रोजी शिवशंभू ग्रुप, घोडेकर मळा, संगमनेर येथे हे शिबिर उत्साहात पार पडले.

या शिबिरात चैतन्य हॉस्पिटल, संगमनेर येथील तज्ञ डॉक्टर व रुग्णसेवकांनी सहभाग घेत नागरिकांची आरोग्य तपासणी केली. यावेळी ७० हून अधिक रुग्णांची तपासणी करून त्यांना आवश्यक उपचार व आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिरामध्ये नागरिकांना तज्ञ डॉक्टरांकडून विनामूल्य रोगनिदान, तसेच आवश्यकतेनुसार रक्त तपासणी, ईसीजी व इतर वैद्यकीय तपासण्या उपलब्ध करून देण्यात आल्या. तपासणीदरम्यान निदान झालेल्या आजारांवर पुढील उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच आवश्यक असलेल्या रुग्णांना शिबिरानंतर आवश्यक शस्त्रक्रिया व उपचारासाठी मदत उपलब्ध करून देण्याची माहिती देण्यात आली.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून केवळ धार्मिक उपक्रम न राबविता समाजोपयोगी आणि आरोग्यविषयक उपक्रमांना प्राधान्य देत ‘श्रीगणेशा आरोग्याचा’ अभियान राबविण्यात आल्याने नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले. रघुनंदन मित्र मंडळ व चैतन्य रुग्णालयाच्या या उपक्रमामुळे आर्थिकदृष्ट्या गरजू नागरिकांना तज्ज्ञ वैद्यकीय सेवा व मार्गदर्शन मिळाले.

## दिनविशेष

२००१: काश्मीर आतंकी हल्ला — राज्य विधानसभेच्या इमारतीवर अतिरेक्यांनी हल्ला केला त्यात किमान ३८ लोकांचे निधन.
१९९२: कार्टून नेटवर्क चॅनल — सुरु झाले.
१९८२: सोनी — कंपनीने पहिले कॉम्पॅक्ट डिस्क प्लेयर प्रकाशित केले.
१९७९: MTR, हाँगकाँग — जलद परिवहन रेल्वे प्रणाली सुरु झाली.
१९७८: तुवालू — देशाला युनायटेड किंगडमपासून स्वातंत्र्य मिळाले.
१९७१: सीटी स्कॅनर — रुग्णाचे निदान करण्यासाठी पहिले व्यावहारिक सीटी स्कॅनर वापरले गेले.
१९७१: वॉल्ट डिस्ने वर्ल्ड, फ्लोरिडा, अमेरिका — सुरु झाले.
१९६९: कॉनकॉर्ड विमान — प्रथमच ध्वनीगती पेक्षा जोरात उडण्यात यशस्वी झाले.
१९६४: जपानी शिंकनसेन (बुलेट ट्रेन) — टोकियो ते ओसाका पर्यंत हाय-स्पीड रेल्वे सेवा सुरू.

## जन्म

१९४५: इशर जज अहलुवालिय — भारतीय अर्थशास्त्र (निधन: २६ सप्टेंबर २०२० )
१९४५: रामनाथ कोविंद — भारता देशाचे १४वे राष्ट्रपती
१९४०: मार्क सॅवॉय — अमेरिकन एकॉर्डियन प्लेयर, कॅजुन एकॉर्डियनचे निर्माते
१९३७: सईद अहमद — पाकिस्तानी क्रिकेटपटू
१९३१: अन्वर शमीम — पाकिस्तानी जनरल (निधन: ५ जानेवारी २०१३ )
१९३०: नईमतुल्ला खान — पाकिस्तानी वकील आणि राजकारणी (निधन: २५ फेब्रुवारी २०२० )
१९३०: जे. एच. पटेल — कर्नाटकचे १५ वे मुख्यमंत्री (निधन: १२ डिसेंबर २००० )
१९२८: शिवाजी गणेशन — दाक्षिणात्य अभिनेते (निधन: २१ जुलै २००१ )
१९२४: विल्यम रेहनक्विस्ट — अमेरिकन वकील आणि कायदेतज्ज्ञ, अमेरिका देशाचे १६वे मुख्य न्यायाधीश (निधन: ३ सप्टेंबर २००५ )
१९२४: जिमी कार्टर — अमेरिकेचे ३९ वे राष्ट्राध्यक्ष — नोबेल पुरस्कार
१९२२: चेननिन्ग यांग — चीनी-अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ, शैक्षणिक — नोबेल पुरस्कार

## मृत्यू

१९९७: गुल मोहम्मद — जगातील सर्वात बुटकी व्यक्ती (२२.१")
१९५९: एनरिको डी निकोला — इटली देशाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: ९ नोव्हेंबर १८७७ )
१९५९: इरिको डी निकोला — इटली प्रजास्ताकचे पहिले अध्यक्ष (जन्म: ९ नोव्हेंबर १८७७ )
१९५५: चार्ल्स क्रिस्टी — अमेरिकन चित्रपट निर्माते, क्रिस्टी फिल्म कंपनीचे संस्थापक (जन्म: १३ एप्रिल १८८२ )
१९४२: अन्ट्स पिईप — एस्टोनिया देशाचे ७वे पंतप्रधान (जन्म: २८ फेब्रुवारी १८८४ )
१९३१: दिवाकर — नाट्यछटाकार (जन्म: १८ जानेवारी १८८९ )
१८६८: राम (चौथा) — थायलंडचा राजा मोंगकुट ऊर्फ (जन्म: १८ ऑक्टोबर १८०४ )
११२७: मेलिटेनचे मॉर्फिया — जेरुसलेम देशाची राणी
०९५९: एडविग — इंग्रज राजा (जन्म: ९४०/९४१ )
०९१८: झोउ — शू साम्राज्याची सम्राज्ञी
०६८६: सम्राट तेन्मू — जपान देशाचे सम्राट (जन्म: ६३१ )
०६३०: ताजूम उक'ब कहक' — माया साम्राज्याचे राजा
२०२२: तुलसी तंती — भारतीय अक्षय ऊर्जा कार्यकारी, सुझलॉनचे संस्थापक




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**०१ ऑक्टोबर**

# २००१ : काश्मीर विधानसभेवर दहशतवादी हल्ला
## आत्मघाती स्फोटात ३८ जणांचा मृत्यू

१ ऑक्टोबर २००१ रोजी जम्मू-काश्मीरची राजधानी श्रीनगर येथे राज्य विधानसभेच्या संकुलावर भीषण दहशतवादी हल्ला झाला. जम्मू-काश्मीरमधील वाढत्या दहशतवादाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या हल्ल्याने संपूर्ण देशाला हादरवून सोडले. विधानसभा संकुलाला लक्ष्य करून करण्यात आलेल्या या आत्मघाती हल्ल्यात सुमारे ३८ जणांचा मृत्यू, तर अनेक जण जखमी झाले.त्या दिवशी दुपारच्या सुमारास स्फोटकांनी भरलेले वाहन विधानसभा संकुलाच्या दिशेने आणण्यात आले. हल्लेखोरांनी वाहनाचा वापर करून संकुलाच्या प्रवेशद्वाराजवळ मोठा स्फोट घडवून आणला. स्फोटाची तीव्रता एवढी होती की परिसरात मोठी हानी झाली. त्यानंतर दहशतवाद्यांनी गोळीबार केल्याचेही सांगण्यात आले. सुरक्षा दलांनी तातडीने कारवाई करत परिसराला वेढा घातला आणि दहशतवाद्यांविरोधात प्रतिकार केला.या हल्ल्याची जबाबदारी जैश-ए-मोहम्मद या पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटनेशी संबंधित दहशतवाद्यांवर ठेवण्यात आली. हल्ल्याचा मुख्य उद्देश जम्मू-काश्मीरमधील राजकीय व्यवस्थेला लक्ष्य करणे आणि मोठ्या प्रमाणावर भीती निर्माण करणे हा असल्याचे तपासातून समोर आले.विधानसभा संकुल हे अत्यंत संवेदनशील आणि कडक सुरक्षा असलेले ठिकाण असल्याने या हल्ल्यामुळे सुरक्षा व्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले. हल्ल्यानंतर संपूर्ण श्रीनगरमध्ये सुरक्षा वाढविण्यात आली. महत्त्वाच्या सरकारी इमारती, सार्वजनिक ठिकाणे आणि राजकीय नेत्यांच्या सुरक्षेचा आढावा घेण्यात आला.या घटनेचा जम्मू-काश्मीरच्या राजकीय वातावरणावरही मोठा परिणाम झाला. दहशतवादी संघटनांकडून लोकशाही संस्थांना लक्ष्य करण्याचा धोका किती गंभीर आहे, हे या हल्ल्याने अधोरेखित केले. विधानसभा ही लोकशाही व्यवस्थेचे प्रतीक असल्याने तिच्यावर झालेला हल्ला हा केवळ सुरक्षा यंत्रणेसाठीच नव्हे, तर लोकशाही व्यवस्थेसाठीही मोठे आव्हान मानला गेला.हा हल्ला १३ डिसेंबर २००१ रोजी झालेल्या भारतीय संसदेवरील दहशतवादी हल्ल्याच्या काही महिन्यांपूर्वी झाला होता. त्यामुळे २००१ हे वर्ष भारताच्या दहशतवादविरोधी लढ्यात अत्यंत संवेदनशील ठरले. जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी कारवायांबरोबरच देशातील महत्त्वाच्या लोकशाही संस्थांवरील संभाव्य हल्ल्यांचा धोका या काळात प्रकर्षाने समोर आला.विधानसभा हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिक आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या स्मृती आजही या घटनेशी जोडलेल्या आहेत. या हल्ल्याने दहशतवादाविरोधात सुरक्षा यंत्रणांमध्ये अधिक समन्वय, संवेदनशील ठिकाणांची सुरक्षा मजबूत करणे आणि गुप्तचर यंत्रणांची कार्यक्षमता वाढविण्याची गरज अधोरेखित केली.१ ऑक्टोबर २००१ चा श्रीनगर विधानसभा हल्ला हा जम्मू-काश्मीरच्या इतिहासातील एक काळा दिवस मानला जातो. लोकशाहीच्या संस्थेला लक्ष्य करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या या हल्ल्याने दहशतवादाचा धोका किती गंभीर आहे, याची देशाला पुन्हा जाणीव करून दिली.

# रामनाथ कोविंद : भारताचे १४ वे राष्ट्रपती

**जन्मिदन विशेष**

रामनाथ कोविंद हे भारताचे १४वे राष्ट्रपती होते. त्यांचा जन्म १ ऑक्टोबर १९४५ रोजी उत्तर प्रदेशातील कानपूर जिल्ह्यातील परौंख या गावात झाला. साध्या ग्रामीण कुटुंबातून आलेल्या कोविंद यांनी आपल्या कष्ट, शिक्षण आणि सार्वजनिक जीवनातील प्रदीर्घ अनुभवाच्या जोरावर देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदापर्यंत मजल मारली.कोविंद यांनी कानपूर विद्यापीठातून वाणिज्य आणि कायद्याचे शिक्षण घेतले. त्यानंतर त्यांनी दिल्ली उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात वकिली केली. सार्वजनिक जीवनात प्रवेश करण्यापूर्वी त्यांनी काही काळ केंद्र सरकारचे वकील म्हणूनही काम केले. त्यांच्या कायदेविषयक ज्ञानामुळे आणि संविधानाच्या अभ्यासामुळे त्यांना सार्वजनिक जीवनात वेगळी ओळख मिळाली.१९७७ मध्ये त्यांनी तत्कालीन पंतप्रधान मोरारजी देसाई यांचे विशेष कार्य अधिकारी म्हणून काम केले. त्यानंतर ते भारतीय जनता पक्षाशी जोडले गेले. १९९४ मध्ये उत्तर प्रदेशातून राज्यसभेवर त्यांची निवड झाली. सलग दोन कार्यकाळ त्यांनी राज्यसभेत काम केले. या काळात त्यांनी विविध संसदीय समित्यांवर सदस्य म्हणून जबाबदारी पार पाडली. सामाजिक, कायदेविषयक आणि प्रशासकीय विषयांवरील त्यांचा अभ्यास त्यांच्या संसदीय कारकिर्दीत दिसून आला.रामनाथ कोविंद यांनी बिहारचे ३७वे राज्यपाल म्हणूनही काम केले. ऑगस्ट २०१५ ते जुलै २०१७ या कालावधीत त्यांनी बिहारच्या राज्यपालपदाची जबाबदारी सांभाळली. राज्यपाल म्हणून त्यांच्या कार्यकाळात त्यांनी घटनात्मक मर्यादा आणि प्रशासकीय प्रक्रियेचे पालन करण्यावर भर दिला.२०१७ मध्ये भारताच्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (NDA) त्यांना उमेदवार केले. त्यांनी विरोधी पक्षांच्या



उमेदवार मीरा कुमार यांचा पराभव केला आणि २५ जुलै २०१७ रोजी भारताचे १४वे राष्ट्रपती म्हणून शपथ घेतली. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत विजयी झाल्यानंतर देशातील विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.राष्ट्रपती म्हणून कोविंद यांनी संविधानाचे संरक्षण, सामाजिक समावेशकता, शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि वंचित घटकांच्या विकासावर भर दिला. देशातील विविध राज्यांना भेटी देऊन त्यांनी नागरिकांशी संवाद साधला. विद्यापीठांचे दीक्षान्त समारंभ, लष्करी कार्यक्रम, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध कार्यक्रमांमध्ये त्यांनी राष्ट्रपती म्हणून भारताचे प्रतिनिधित्व केले.त्यांच्या कार्यकाळात भारताने अनेक महत्त्वाच्या राष्ट्रीय घडामोडी अनुभवल्या. २०१९ मध्ये दुसऱ्यांदा नरेंद्र मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतरच्या काळातही कोविंद राष्ट्रपती होते. कोविड-१९ महामारीच्या काळातही त्यांनी राष्ट्रपतीपदाची जबाबदारी पार पाडली.रामनाथ कोविंद यांचा राष्ट्रपती म्हणून कार्यकाळ २५ जुलै २०१७ ते २५ जुलै २०२२ असा राहिला. त्यानंतर द्रौपदी मुर्मू यांनी भारताच्या १५व्या राष्ट्रपती म्हणून पदभार स्वीकारला.प्रमुख वैशिष्ट्ये राहिली आहेत.

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



## जिल्हा बँक निवडणुकीत इच्छुकांची झुंबड

### दुसऱ्या दिवशी १७० अर्जांची विक्री, बिनविरोधासाठी नेत्यांचे प्रयत्न सुरूच

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी जिल्ह्यातील प्रमुख नेत्यांकडून राजकीय पातळीवर प्रयत्न सुरू असतानाच दुसरीकडे उमेदवारी अर्ज खरेदीसाठी इच्छुकांची झुंबड उडाली आहे. उमेदवारी अर्ज विक्रीच्या दुसऱ्या दिवशी तब्बल १७० अर्जांची विक्री झाली. त्यामुळे पहिल्या दिवशी ३६१ असलेली अर्ज विक्रीची संख्या दुसऱ्या दिवशी ५३१ वर पोहोचली आहे. अर्ज खरेदीसाठी वाढत असलेली गर्दी पाहता बिनविरोध निवडणुकीच्या प्रयत्नांसमोर आव्हान उभे राहण्याची चिन्हे दिसत आहेत.

दरम्यान, दुसऱ्या दिवशी तीन उमेदवारांनी प्रत्यक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले. यामध्ये राहुरी तालुका विकास सोसायटी मतदारसंघातून भाजपचे आमदार प्राजक्त तनपुरे, महिला राखीव मतदारसंघातून जिल्हा परिषद अध्यक्षा मंजूषा गुंड आणि बिगरशेती मतदारसंघातून धनलक्ष्मी हजारे यांचा समावेश आहे.

मंगळवारी उमेदवारी अर्ज खरेदीसाठी इच्छुकांची मोठी गर्दी झाली होती. अनेक इच्छुकांनी एकाचवेळी एकापेक्षा अधिक अर्ज खरेदी केल्याचे दिसून आले. त्यामुळे अर्जांची संख्या झपाट्याने वाढली असून, आगामी काळात निवडणुकीतील चुरस आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. माजी अध्यक्ष चंद्रशेखर घुले पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा राजश्रीताई घुले पाटील, बँकेचे माजी अध्यक्ष सीताराम पाटील गायकर, माजी उपाध्यक्ष रामदास वाघ, संचालक प्रशांत गायकवाड, गीतांजली शेळके, पांडुरंग सोले पाटील, घनश्याम शेलार तसेच प्रमोद राहणे यांनी उमेदवारी अर्ज खरेदी केल्याची माहिती निवडणूक सूत्रांनी दिली.




याशिवाय जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अण्णासाहेब शेलार, पारनेरचे वैभव लंके, विजयलक्ष्मी फाळके यांच्यासह अन्य इच्छुकांनीही अर्ज खरेदी केल्याचे सांगण्यात आले.

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी प्रमुख राजकीय नेत्यांच्या पातळीवर हालचाली सुरू आहेत. मतदारसंघनिहाय संभाव्य उमेदवारांमध्ये समन्वय साधण्याचे प्रयत्न सुरू असतानाच मोठ्या संख्येने अर्जांची विक्री होत असल्याने बिनविरोध निवडणुकीचे प्रयत्न कितपत यशस्वी ठरतात, याकडे आता लक्ष लागले आहे.

अंतिम टप्प्यात अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया

जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज खरेदी व दाखल करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. बुधवार आणि गुरुवार हे दोन दिवस इच्छुकांना अर्ज खरेदी करून दाखल करता येणार आहेत. त्यानंतर शुक्रवार ते रविवार सलग तीन दिवस सुट्ट्या असल्याने इच्छुकांना अर्ज दाखल करण्यासाठी ५ ऑक्टोबरच्या अंतिम मुदतीपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे.

त्यामुळे उर्वरित दोन दिवसांत उमेदवारी अर्ज खरेदी आणि दाखल करण्याच्या प्रक्रियेला आणखी वेग येण्याची शक्यता असून, कोणत्या मतदारसंघातून किती उमेदवार रिंगणात उतरणार, याचे चित्र अंतिम मुदतीनंतरच स्पष्ट होणार आहे.

## लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन सफायरतर्फे 'सॅफ्रॉन शॉपिंग महोत्सव'

### २ ते ६ ऑक्टोबर दरम्यान पाच दिवसांची पर्वणी; प्रवेश मोफत




युवावार्ता (प्रतिनिधी )

नवरात्र आणि दिवाळी उत्साहाच्या पार्श्वभूमीवर संगमनेरकरांसाठी खरेदी, खाद्यपदार्थ आणि मनोरंजनाची अनोखी पर्वणी घेऊन लायन्स क्लब संगमनेर सॅफ्रॉन सफायर, डिस्ट्रिक्ट ३२३४ D2 यांच्या वतीने भव्य 'सॅफ्रॉन शॉपिंग महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाचे आयोजन शुक्रवार, २ ऑक्टोबर ते मंगळवार, ६ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत मालपाणी लॉन्स, लक्ष्मी रोड, संगमनेर येथे करण्यात आले आहे.

"5 DAYS EXPO - FUN, FOOD SHOP' अशी संकल्पना असलेल्या या महोत्सवात नागरिकांना एकाच छताखाली विविध प्रकारच्या वस्तू, फॅशन, ज्वेलरी, गृहउपयोगी वस्तू, महाराष्ट्रीयन, चायनीज, पंजाबी खाद्यपदार्थ तसेच मनोरंजनाचा आनंद घेता येणार आहे. 'शॉपिंगचा मनमुराद आनंद' देणाऱ्या या महोत्सवासाठी प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आला आहे. या प्रदर्शनात विविध क्षेत्रातील कंपन्या व व्यावसायिक सहभागी होणार आहेत. यामध्ये फॅशन, कपडे, ज्वेलरी, ब्युटी प्रॉडक्ट्स, होम डेकोरेशन, लाईफस्टाईल, महिला व पुरुषांसाठी विविध उत्पादने तसेच विविध व्यावसायिक सेवा यांचा समावेश आहे. त्यामुळे सणासुदीच्या खरेदीसाठी नागरिकांना विविध पर्याय एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत.

महोत्सवाचे आणखी एक आकर्षण म्हणजे फूड फेस्टिव्हल. विविध चविष्ट खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी अनेक खाद्यव्यावसायिक सहभागी होत असून महाराष्ट्रीयन, चायनीज, पंजाबी, पाणीपुरी, विविध स्नॅक्स, स्वीट्स, बेकरी पदार्थ आणि इतर खाद्यपदार्थ उपलब्ध असणार आहेत. त्यामुळे खरेदीसोबतच कुटुंबीय व मित्रपरिवारासोबत खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्याची संधी नागरिकांना मिळणार आहे. लहान मुलांसह संपूर्ण कुटुंबासाठी फन आणि मनोरंजनाची विशेष व्यवस्था करण्यात आली असून महोत्सवात विविध गेम्स, मनोरंजनाची साधने आणि आकर्षणे ठेवण्यात आली आहेत. त्यामुळे हा केवळ शॉपिंग एक्स्पो न राहता 'फन, फूड आणि शॉपिंग'चा कौटुंबिक अनुभव देणारा महोत्सव ठरणार आहे.

या महोत्सवाच्या आयोजनासाठी प्रकल्प समन्वयक गिरीश मालपाणी, श्रीनिवास भंडारी व प्रफुल्ल खिवसरा यांच्यासोबत अतुल अभंग (प्रकल्प प्रमुख), कल्याण कासट (प्रकल्प प्रमुख), जितेंद्र लोंढा (अध्यक्ष व प्रकल्प प्रमुख), नम्रता अभंग (सचिव) आणि चंद्रशेखर गाडे (खजिनदार) आणि संपूर्ण प्रकल्प समिती परिश्रम घेत आहे. २ ते ६ ऑक्टोबरदरम्यान सकाळी १० ते रात्री ९.३० वाजेपर्यंत हा महोत्सव नागरिकांसाठी खुला राहणार आहे. संगमनेर शहरासह परिसरातील नागरिकांनी कुटुंबीयांसह मोठ्या संख्येने उपस्थित राहून सॅफ्रॉन शॉपिंग महोत्सवातील खरेदी, फूड फेस्टिव्हल आणि मनोरंजनाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## वाळू तस्करांना लगाम कोण घालणार ?

### अकलापूर-शेळकेवाडी शिवारात विनानंबर टिपरसह दोन ब्रास वाळू जप्त



### महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**दरम्यान, पठारभागातील खंदरमाळ, शेळकेवाडी व परिसरात रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून होत आहेत. मुळा नदीपात्रातून सुरू असलेल्या या कथित वाळू उपशामुळे नदीपात्राचे तसेच पर्यावरणाचे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे. पोलिसांकडून कारवाई होत असताना महसूल प्रशासनाच्या पथकांकडून या प्रकारावर प्रभावीपणे नियंत्रण का ठेवले जात नाही, असा सवाल नागरिक व पर्यावरणप्रेमींकडून उपस्थित केला जात आहे.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- पठारभागातील अकलापूर-शेळकेवाडी शिवारात मुळा नदीपात्रातून बेकायदेशीररीत्या वाळू उपसा करून वाहतूक करणाऱ्या विनानंबर टिपरवर घारगाव पोलिसांनी मंगळवारी (दि. २९) पहाटे साडेअडीचच्या सुमारास कारवाई केली. या कारवाईत अंदाजे दोन ब्रास वाळूसह सुमारे १० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. या प्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घारगाव पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस पथक रात्रीची गस्त घालत असताना अकलापूर-शेळकेवाडी शिवारात विनानंबर टिपरमधून चोरीची वाळू वाहतूक केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानंतर पोहेकॉ. एकनाथ खाडे, पोकॉ. सुभाष बोडखे, होमगार्ड सागर खेमनर व प्रवीण घुले यांच्या पथकाने अकलापूर शिवारातील मुळा नदी परिसरात पाहणी केली. यावेळी संशयित टिपर आढळून आल्यानंतर पोलिसांनी चालकाला वाहन थांबविण्याचा इशारा केला. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये गौण खनिज अर्थात वाळू आढळून आली. वाळू वाहतुकीचा परवाना चालकाकडे नसल्याचे तपासणीत स्पष्ट झाले. चौकशीत चालकाने आपले नाव दादाभाऊ नामदेव मधे (रा. शेळकेवाडी, अकलापूर, ता. संगमनेर) असे सांगितले. त्याच्यासोबत संदीप विलास मधे (रा. शेळकेवाडी, अकलापूर) असल्याचे समोर आले.

टिपरच्या मालकीबाबत चौकशी केली असता संदीप महादू नंदकर (रा. शेळकेवाडी, अकलापूर) यांचे नाव समोर आले. सदर वाळू मुळा नदीपात्रातून भरून आणल्याची माहितीही पोलिसांना मिळाली. त्यानंतर पंचनामा करून अंदाजे दोन ब्रास वाळू, किंमत २० हजार रुपये, तसेच सुमारे १० लाख रुपये किमतीचा टिपर, असा एकूण १० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ. बाबुराव गोर्डे करीत आहेत.

अवैध वाळू उपशाला आळा घालण्यासाठी महसूल प्रशासनाकडून नियमित गस्त, तपासणी आणि कठोर कारवाई होणार का? तसेच या प्रकारामागे नेमके कोण आहेत, याचा तपास होणार का, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165













दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25